



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६४ वे * अंक ८४ * नांदेड * रविवार, दि. ३० मार्च २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211


## उज्जैनप्रमाणे पंढरपूरमध्येही कॉरिडॉर उभा होणार, तीन महिन्यांत कामाला सुरुवात –देवेंद्र फडणवीस

**सोलापूर (प्रतिनिधी)–** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ड्रीम प्रोजेक्ट असलेल्या उज्जैन काशी विश्वेश्वरच्या धर्तीवर पंढरपूर कॉरिडॉरला येत्या तीन महिन्यांमध्ये कामाला सुरुवात होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेतलं. त्यानंतर विभागीय आयुक्त पालकमंत्री जिल्हाधिकारी इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन त्यांनी तयार केलेला आराखडा पाहिला आणि त्यानंतर त्यांच्या आराखड्याला हिरवा कंदील दाखवलेला आहे.



आतापर्यंत कोणत्याही प्रकल्पग्रस्तांना मोबदला दिला नाही, त्याच्यापेक्षा जास्त मोबदला पंढरपूर मधल्या कॉरिडॉर बाधितांना देण्यात येईल असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. यासाठी काही व्यावसायिक मालमत्ता, काही घरं ताब्यात घ्यावी लागणार आहेत. त्या लोकांचे सुद्धा योग्य पद्धतीने पुनर्वसन केलं जाईल. त्यांना चांगला मोबदला दिला जाईल. आषाढीपूर्वी काही काम सुरू होतील आणि आषाढीच्या नंतर यातली काही काम सुरू होतील अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

रायगड किल्ल्यावरील वाघ्या कुत्र्याचा पुतळा हटवण्यावरून मुख्यमंत्री यांनी नाराजी व्यक्त केलेली आहे. प्रत्येक गोष्टीमध्ये वाद करण्याची गरज नाही. धनगर आणि मराठा असा वाद करणे योग्य नाही. संभाजीराजे जर म्हणत असतील मी त्यांना वेळ देत नाही तर ते चुकीचं आहे असं सांगत मुख्यमंत्र्यांनी नाराजी व्यक्त केली. संभाजीराजेंशी मी फोनवर बोलतो आणि तसेच प्रत्यक्षही भेटत असतो असं मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं.

अजितदादांनी कर्जमाफी बाबत घेतलेली भूमिका योग्य आहे आणि तीच सरकारची भूमिका आहे. अजितदादांनी कर्जमाफी कधीही शक्य नाही, असं वक्तव्य केलं नाही असं म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची पाठराखण केली.

## एप्रिलच्या सुरुवातीला अवकाळी पाऊस महाराष्ट्राला झोडपणार

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात गेल्या काही दिवसांपासून तापमानाचा उच्चांक दिसत आहे. उन्हाचा चटका असह्य झाला आहे. संपूर्ण विदर्भात ४० अंशांच्या पुढे तापमान गेल्याने धडकी भरेल एवढं तापमान नोंदवलं जात आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातही कमाल तापमानाचा पारा ३८– ४० अंशानदरम्यान आहे. दरम्यान भारतीय हवामान केंद्राने गुढीपाडव्यापासून आता संपूर्ण राज्यभर अवकाळी पावसाचे इशारा दिला आहे.

दक्षिण मध्य महाराष्ट्रापासून अवकाळी पावसाला आजपासून सुरुवात होणार आहे. मार्चच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच ३१ मार्चला ठाणे, पालघर, नाशिक, धुळे, नंदुरबार, अहिल्यानगर, सातारा सांगली कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांना येलो अलर्ट देण्यात आला आहे. येलो अलर्ट नसला तरी पुण्यासह मध्य महाराष्ट्र कोकण व मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना हलक्या व मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.

## राज्यात महायुतीचे सरकार आणि मी युतीचा धर्म पाळणारा नेता –खा.अशोकराव चव्हाण

- मी नात्या-गोत्यापेक्षा पक्षाची भुमिका घेऊन चालणारा
- खतगावकरांचा 'राष्ट्रवादी' प्रवेश त्यांचा व्यक्तीगत प्रश्न

**नरसीफाटा (प्रतिनिधी)–** राज्यात महायुतीचे सरकार आहे, त्यामुळे महायुतीत गैरसमज होणारे माझे कुठलेही वक्तव्य राहणार नाही. मी महायुतीचा जबाबदार नेता असून युती धर्म पाळणारा आहे, अशी स्पष्ट भुमिका राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांनी व्यक्त केली आहे. बिलोली तालुक्यातील सगरोळी येथील एक कार्यक्रम आटोपून नरसी येथे भाजप नेते श्रावण पाटील भिलवंडे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. मी नात्या-गोत्यापेक्षा पक्षाची भुमिका घेऊन चालणारा असून भास्करराव खतगावकर यांचा 'राष्ट्रवादी' प्रवेश हा त्यांचा व्यक्तीगत प्रश्न असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.



काही दिवसांपूर्वी नरसी येथे माजी खासदार भास्करराव खतगावकर यांनी मोठे शक्तीप्रदर्शन करुन अजित पवारांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस मध्ये प्रवेश केला. यावेळी राष्ट्रवादीच्या नेत्यांनी अशोकराव चव्हाण यांच्यावर भाष्य केले होते. त्यासंदर्भातच पत्रकारांनी खा. चव्हाणांना प्रश्न विचारले. यावेळी त्यांनी पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. ते म्हणाले की, राज्यात महायुतीचे सरकार आहे आणि तीन पक्ष मिळून सरकार चालवत आहेत. त्यामुळे माझं कुठलही असं वक्तव्य राहणार नाही ज्यातून महायुतीत गैरसमज निर्माण होणार नाही. जागा कुणी किती लढवायच्या, स्वबळावर लढायचं की, एकत्रपणे लढायचं, हा पुढचा प्रश्न आहे. निवडणूक कशी लढवायची हे कार्यकर्त्यांच्या भावनांचा विचार करुन निर्णय घेण्यात येईल. त्यामुळे महायुतीच्या राज्यात एकमेकांबद्दल बोलण्याची माझी भुमिका राहणार नाही. मी सकारात्मक भुमिका घेवून चालणारा माणूस आहे.

भास्करराव खतगावकर यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस प्रवेशाबाबत बोलताना खा. चव्हाण म्हणाले की, मी राजकारणात नात्या-गोत्यापेक्षा पक्षाची भुमिका घेवून चालणारा नेता आहे. त्यांनी जो निर्णय घेतला, तो त्यांचा व्यक्तीगत प्रश्न आहे, असे स्पष्ट केले.

अशोकराव चव्हाण हे पहिल्यांदाच श्रावण भिलवंडे यांच्या निवासस्थानी आले असल्याने श्रावण भिलवंडे यांनी त्यांचे फटाक्यांची अतिषबाजी करुन जोरदार स्वागत केले. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष संतुकराव हंबर्डे, बिलोलीचे आमदार जितेश अंतापूरकर, नरेंद्र चव्हाण, बालाजी बच्चेवार, किशोर स्वामी यांची उपस्थिती होती.

गोदातीर समाचार



**आज गुढीपाडवा**

मराठी नववर्ष तथा गुढीपाडव्यानिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

**–संपादक**

**सुट्टीची सूचना**

आज गुढीपाडवानिमित्त कार्यालयास सुट्टी असल्याने उद्या दि. ३१ मार्च २०२५ चा गोदातीर समाचारचा अंक प्रकाशित होणार नाही. तरी वाचक, जाहिरातदार, एजंट यांनी याची नोंद घ्यावी.

**– व्यवस्थापक**

## चालत्या ट्रकमधून पाच लाख रुपयांची सुपारी चोरली

### दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** नागपूरकडे सुपारी घेऊन जाणाऱ्या ट्रकमधील पाच लाख रुपये किंमतीची नऊ क्विंटल सुपारी आरोपी सोहेल व त्याच्या साथीदाराने चोरून नेली. ही घटना दि. २८ मार्च रोजी पहाटे साडेचारच्या सुमारास बोंढार बायपास जवळ घडली.

नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतून ट्रक क्रमांक (के.ए. २९ बी- ६८८०) मध्ये सुपारी भरून नागपूरकडे बोंडार बायपासमार्गे सदरील ट्रक जात होता. रस्ता खराब असल्याने ट्रकचा वेग मंदावल्याने पाठीमागून आलेल्या आरोपी सोहेल व त्याच्या साथीदाराने ट्रकमध्ये चढून ट्रकमधील नऊ क्विंटल दहा किलो सुपारी चोरली. या सुपारीची अंदाजे किंमत पाच लाख रुपये आहे. चालक मोहम्मद रफीक मोहम्मद इलियास मुसा याच्या फिर्यादीवरून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मटवाड करत आहेत.






# सालगडी

## कथा

गोंद्याला शेवटचा अग्नी दिला. आयुष्यात आजच तो शांत झोपला होता. अन् तेही कायमचे. मागे रडणारे कुणी नव्हते. या बाबतीत तेवढा तो सुखी होता. मागच्या महिन्यातच त्याची म्हातरी बायको गेली. तिच्यासाठी फक्त गोंद्या रडला होता. गोंद्याला मुलं नव्हती. भावकीतल्या कुणीतरी त्याला अग्नी दिला. आता पुढील कार्य गोंद्याचे तोच करणार होता. त्या बदल्यात गोंद्याची झोपडी आणि सभोवलताची काही जागा त्याला मिळणार होती. गोंद्याच्या जाण्याने कुणाला दु:ख नव्हते. फक्त थोडीफार हळहळ होती.

पठारी नावाचे एक आडवळणावर असणारे खेडे, हे गोंद्याचे गाव होते. आईवडलांच्या विवाह पश्चात जन्माला आलेले एकुलते एक बाळ म्हणजे गोंद्या. आईवडीलांचे भांडवल म्हणजे त्यांचे सुखरूप असणारे हात पाय. याच भांडवलावर कुणातरी शेतकऱ्याकडे मजुरी करून तिघांचे पोट भरत होते. गोंद्या मोठा झाला, म्हणजे रानात शेळ्या गुरांच्या राखणी एवढा. मग पुढे त्याचे पोट त्यालाच भरावे लागले. गुरं राखण्याची गोंद्याला काही मजुरी मिळत नव्हती. फक्त तीने वेळेला जेवण मिळत होते. गावातल्या मजुरांच्या मुलाला हेही भरपूर होते. कुठल्यातरी शेतकऱ्याची गुरं किंवा शेळ्या राखायच्या. तो काही जेवण देईल, त्यावर दिवस ढकलायचा. रानात गेल्यावर रानमेवा हाच गोंद्याचा खुराक होता. परंतु असे जास्त दिवस चालणारे नव्हते. गोंद्या थोराट बाप्या दिसायला लागला. आता त्याचे दोनाचे चार हात करायला लागतील. गरीबी असली तरी सुज्ञ पालकांचा विचार या बाबतीत कमी ठरत नाही. आणि वधू संशोधनाला सुरवात झाली.

वधू मिळायला कठिण नव्हते. अपेक्षा दोन्हीकडून नव्हत्या. परंतु आता लग्न कसे करायचे?. दोन्ही पक्षांपुढे हाच मोठा गुंता होता. कारण सर्व सोंगे करता येतात. पैशाचे सोंग करता येत नाही. घरची फाटकी झोळी असली तरी समाज काय म्हणेल?. या समाज काय म्हणेल?. या वाक्याने अनेक कुटुंबाची प्रगती होऊ दिलेली नाही. वधु पक्षाने पुर्णपणे हात वर केले.

आमच्या जवळच काही नाही, तर मुलीला काय देणार?. जे काय करायचे ते तुम्हीच करा. तुम्हाला मुलगी जरी बिन लग्नाची घेऊन जायची असेल, तरी आमची हरकत नाही.

गोंद्याच्या आईवडीलांनी बिना लग्नाची मुलगी घरी आणायचा विचारही केला होता. परंतु नको समाज काय म्हणेल?. ज्या मुलाला जन्म दिला. त्याचे लग्नही तुम्ही करू शकत नाही. मग सुरवात झाली कुणी सावकार बघायला. जो लग्नासाठी कर्ज देतो का ते. गावात काही त्यांना सावकार मिळाला नाही. कारण तारण ठेवायला काही नाही. ही माणसं कर्ज फेडणार तरी कशी?. खूप शोधाशोध केल्यावर शेजारच्या गावातला एक मध्यमवर्गीय शेतकरी यांना कर्ज द्यायला तयार झाला. कर्जाचे स्वरुप असे होते. लग्नाला जो काही खर्च येईल, तो शेतकरी पुरवणार होता. त्या बदल्यात गोंद्याने आणि त्याच्या पत्नीने त्या शेतकऱ्याकडे दहा वर्ष चाकरी करायची. गोंद्याचा आणि त्याच्या पत्नीच्या खावटीचा खर्च, सणावाराचा खर्च, घोंगडी पायताण, वर्षाला नवी कापडं शेतकरी पुरवणार होता. गोंद्या आणि त्याची बायको समाज मान्यतेने एकत्र येण्यासाठी, लग्नाअगोदरच सालबंदी झाले. पठारी नि आपटी या दोन्ही गावचे सरपंच, पाटील, आणि दोन्ही गावातले पाच पंच समक्ष व्यवहार ठरला. चारचौघा सारखे लग्न पार पडले. लग्नानंतर पंधरा वीस दिवसात पठारीतले घर आईवडील सोडून गोंद्याला आपटीत यावे लागले. पठारी सोडतांना गोंद्याला जिवावर बेतले होते. परंतु पर्याय नव्हता. आपटीतल्या गावकुसाच्या मोकळ्या जागेत गोंद्याने झोपडे उभे केले. मालकाने संसाराचे सामान त्याला आणून दिले. घरात अन्नधान्य दिले. गोंद्याचा नवा संसार सुरू झाला.

दुसऱ्या कोंबड्याला गोंद्या उठायचा. पहिल्या कोंबड्याला जाग यायची परंतु तो उठत नव्हता. पहिला कोंबडा आरवल्यावर जाग येऊन फायदा नव्हता. कारण इंद्रिये असहकार पुकारायचे. त्यांचाही दोष नसायचा. काल दिवसभर त्यांना यानेच पिळून घेतले होते. सात आठ तास झोपूनही त्यांचा शीणभाग उतरत नव्हता. मग तोही इंद्रियांचा ऐकायचा नि पडून राहयचा. परंतु त्याच्या कारभारनीला इंद्रियांचे ऐकून जमत नव्हते. ती उठायची आणि चूल पेटवायची. जणू काही पहिला कोंबडा पत्नीसाठी आणि दुसरा कोंबडा पतीसाठी अरवत होता. निसर्गाने हेच गुणवैशिष्ट्य कोंबड्यात भरले आहे. काहींना कोंबड्याची गुणवत्ता जिभेवर समजते. न चुकता साडेचार पासून तो माणसाला जागे करायची सुरवात करतो. हेच पुर्वीचे घड्याळ होते.

पहिल्या कोंबड्याला उठल्यावर चूलीवरच्या कढत पाण्याने चूळ भरायचा. चुली समोरच बाडगीच्या फुटक्या तुकड्यावर करपवलेल्या, तंबाखूच्या मशेरीला तळहातावर घेऊन पटापट दात घासायचा. चूलीवरच्या पातेल्यातले, तांब्याभरून कढत पाणी घेऊन तोंड स्वच्छ करायचा. झोपडीच्या दारात लटकवलेल्या घोंगडीची खोल करून डोक्यावर घ्यायचा. कोपऱ्यात उभ्या काठीला हातात घेऊन मालकाचे घर गाठायचा. याला दारात बघताच मालकीन बाई चहाचा कप आणून द्यायची. चहा घेतला की तो वळायचा गोठ्याकडे. याचा कानोसा घेतल्यावर बैलही निवांत पहुडलेले जागे व्हायचे. बैलांना दावणीशी मोकळे करून त्यांच्या मागे नांगर डोक्यावर घेऊन गोंद्या निघायचा. पायाखाली अंधार असायचा. मालकाच्या शेतात नांगर ठेऊन, तो बैलांना चारायला जायचा. एकदा लख्ख उजाडले की हा बैल घेऊन शेतात यायचा. बैलांची पोटं टम्म भरलेली असायची.

बैलाच्या नि त्याच्या आयुष्यात बरेचसे साम्य होते. दोघांनी इनामेऐतबारे मालकाची सेवा करायची. बस्स. .आणखी आयुष्यात नावीन्य काहीच नाही. कदाचित हा विचारही गोंद्याला शिवत नसेल. भावनांना खतपाणी घालण्यासाठी नवे विश्व त्याच्याकडे नव्हते. आता गोंद्याने नांगर जुंपलेला असायचा. इकडे त्याची कारभारीण घरातली आवराआवर झाली की मालकाच्या घरी यायची. तिलाही मालकीण बाई आल्याआल्या चहा द्यायची. चहा घेतला की ती गोठ्याकडे वळायची. गुरांचे शेण भरून गवनीवर टाकायची. गोठा झाडून पुसून स्वच्छ करायची. मालकाच्या घरचे पाणी भरायची. रात्रीची भांडी घासायची. भांडी घासून झाले की मालकीण बाई तिला सकाळचे जेवण द्यायची. जेवण केले की ती शेतावर हजर व्हायची. आता दिवस चांगलाच माथ्यावर आला असायचा. नांगर हकलून गोंद्याला कडाडून भूक लागली असायची. बैलांनी सकाळीच चांगले जेवण केलेले असायचे. गोंद्याला तसी सोय नव्हती. राहूनराहून त्याचे लक्ष वाटेकडे वळायचे. मालकीण बाई भाकऱ्यांची पाटली घेऊन येतांना दिसते का?. मग घटकाभर तो नांगर उभा करायचा. जवळील चंचीतून तंबाखू आणि चूना घेऊन मळायचा. जिभेखाली तंबाखू भरली की पुन्हा, बैलांना आवाज देत काठीखाली फटकारायचा. याची नजर चुकायची आणि मालकीण बाई भाकऱ्या घेऊन हजर व्हायची. मग हा लगबगीने बांधावर यायचा. हात कसेतरी धुवून हातावर भाकरी घेऊन खायचा. शेतातीलच ओढ्यावरचे ओंजलीने पाणी पिऊन पोट गच्च करायचा. नांगराला बैलांचे उभ्यानेच रवंथ सुरू असायचे. मग दुपारचे जेवण थोडे उशिरा व्हायचे. संध्याकाळी मालकाच्या बैलांना काळोख पडेपर्यंत चारायचे रात्री मालकाचे बैल गोठ्यात नेऊन बांधले की हा मोकळा व्हायचा. उद्या सकाळी दुसरा कोंबडा आरवे पर्यंत.

असे आठ एक वर्ष गोंद्याने मालकाकडे काढली. सालबंदी संपायला दोनएक वर्ष शिल्लक होतीच तर. गोंद्याचे वडिल वारले आणि पुन्हा त्यांच्या कार्यासाठी गोंद्याला मालकाकडे पाच वर्षाची सालबंदी घ्यावी लागली. बालपण गावातल्या शेळ्या राखतांना गेले. तरूणपणाची पंधरा वर्ष मालकाचे कर्ज फेडतांना गेले. या पंधरा वर्षात घरात काही पाळणा हलला नाही. तसेही गोंद्याला वाटायचे. बाळाला जन्म देऊन पुढे काय?.

जे माझ्या वडीलांनी केले तेच मी करतोय. पुढे माझा मुलगा करील. आयुष्यात बदल काहीच नसेल तर. कशाला जन्म देऊन त्यालाही असेच गुरासारखे जगायला प्रवृत्त करायचे. परंतु स्त्री सुलभ स्वाभानुसार त्याच्या पत्नीला बाळ असावे, असे मनातून वाटत होतेच. म्हणून तिच्यासाठी गोंद्याने भायभगत पाहिले. परंतु यश आले नाही. आणि त्यांनी प्रयत्न सोडले. एकमेकाशिवाय त्यांना दुसरे कुणी नव्हते. लग्नाचे कर्ज फिटले होते. वडीलांच्या अंतिम विधीचे कर्ज अजून होते. आणखी एक सुगी झाली की तेही फिटणारच होते. आणि अचानक एक दिवस आई वारली. वडीलसाठी पाच सुग्या काढल्या मग आईसाठी का नको. आणि गोंद्याच्या आयुष्यात पाच सुग्या आणखी वाढल्या. आयुष्याची वीस वर्ष सरली. आता मालकाचे काही राहिले नव्हते. गोंद्या बंधन मुक्त झाला. गोंद्याला जन्म गावाची आठवण होती. त्याने पुन्हा गावी येऊन जे काही मिळेल. ते करायचे ठरवले. तो गावी आला. पहिल्या मालकाने त्याला अन्नधान्य व स्वखुशीने पैसे दिले. नेमका त्यावर्षी दुष्काळ होता. बरीच मजुर कुटुंबे रोजगारा निमित्त स्थलांतरीत झाली होती. गोंद्याला गावात रोजगार मिळेना. आपटीच्या मालकाने दिलेले पैसे आणि धान्य संपत आले होते. शेवटी दोघा पतीपत्नीने जुन्या मालकाकडे पुन्हा रोजगारासाठी विचारणा केली. दिवस दुष्काळाचे होते. तरीही जुन्या मालकाला गोंद्याला टाळता आले नाही. कारण वीस वर्ष गोंद्याने इनामेऐतबारे मालकाची चाकरी केली होती. गोंद्या मालकाच्या घरातील सदस्य झाला होता. आता गोंद्याने निर्णय घेतला की मालकाला सोडायचे नाही. तसेही वय वाढू लागले आहे. मुलंबाळ काही नाहीत. कमवायचे कुणासाठी नाही. फक्त जगायचे आहे. तीन वेळेचे अन्न मिळाले पुष्कळ झाले. गोंद्याने संपूर्ण आयुष्य एका मालकाकडे काढले. .

मागच्या महिन्यात गोंद्याची पत्नी गेली. गोंद्या लहान बाळा सारखा रडला. त्याला जगण्यासाठी फक्त तीच होती. त्याच्या सुखदुःखाची संगती. आईवडील गेले गोंद्या परका झाला नाही. परंतु पत्नीच्या जाण्याने गोंद्या पोरका झाला. आता जगण्याची इच्छा उरली नाही. आयुष्यभर फक्त पोटभरण्यासाठी काबाडकष्ट केले होते. पत्नीच्या मृत्यूनंतर गोंद्याही काही दिवसात गेला. त्याला रडणारे कुणी नव्हते. मालकाला दु:ख झाले. गोंद्याला ओळखणारे थोडेफार हळहळले. कुणीतरी बोलले. .

आयुष्यभर कष्ट उपसले म्हाताऱ्याने. प्रामाणिकपणे एकाच मालकाकडे हयात घालवली. मुलबाळ काही नव्हते. नाकासमोर बघून चालला बिचारा. कुणाचे काही बुडवून गेला नाही. कुणाला कधी दु:ख दिले नाही. .

हेच शब्द गोंद्याचे निवृती वेतन होते.

**प्रभाकर पवार**
मुरबाड, जि. ठाणे
मो. ९२२६१३०७१०

# चिंतनात्मक अंतर्वेशन आलेख : खोल खोल दुष्काळ डोळे

## पुस्तक परीक्षण

**व्यंकटेश सोळंके**
नांदेड
मो. ९९२२६५४७३२




प्रदीप कोकरे यांची चिंतनात्मक लेखन शैली आहे. ते काळाचं वास्तव व तटस्थ प्रतिनिधित्व करणारे लेखक आहेत. कादंबरीचा अंतर्वेशन आवर्तन आलेख छोटा असला तरी चिंतनात्मक अवकाश पट खूप मोठा आहे. निरपेक्षता व स्विकारार्हयता या कादंबरीचा एकंदरीत मुळ गाभा आहे. एकांतरीत किंवा प्रत्यावर्ती जीवन कधीच कोणाच्याही वाट्याला येत नसते. चुकिला कधीच माफी अथवा पर्याय नसतो. आयुष्यात जबाबदारी ही खूप मोठी गोष्ट आहे. त्यामुळे अज्ञान कायमचे पळालेले असते. शिक्षणापेक्षा व्यवहार महत्वाचा असतो.

चाकोरीबद्धशिक्षणापेक्षाआयुष्यातव्यवहारी शिक्षणातून अनेक धडे शिकायला मिळतात. उमेदीचे दिवस निकामी व निरर्थक झाले की वर्तमान हा उज्ज्वल भविष्यापासून खूप दूर जातो. आतले व बाहेरचे जग यातील फरक फार मोठा फरक दिसायला लागतो . त्या दोन्ही मधील सीमारेषा गडद बनते. आपला आवाका व व्याप्ती दोन्ही जगाशी तादात्म्य पावत असतांना जगण्याची कसरत होते. आयुष्यात हरघडी तारांबळ उडते. सुख व दुःख यात मृगजळी अवस्था बनते. ती मनाच्या स्थिर व विचलीत अवस्थेशी जोडलेली असते. मनुष्य गर्दीत राहूनही एकटा असतो. गजबजाटात असूनही तो अलिप्त जगतो. विचाराचे अनेक वेग माणसाला माणसातून वेगळे बनवतात. मग तो विचाराचा भारवाहू होऊन आपल्याच आवर्तनी परिघात घाण्याच्या कोलू सारखा फिरत राहतो. या जगाच्या भाऊगर्दीत तो गांगरूनही जातो. अस्तित्वाच्या शोधात अबोल आत्मिक व सतर्क होतो. पण तसा पोटाचा प्रश्न मुख्य असतो. शिकून कमावलेली अक्कल ही गरजेपुढे नतमस्तक होते. हाताला काम पोटाला भाकर हा तरूणाईतला स्वतःचा स्वतःशी चाकोरीबद्ध असा संघर्ष या कादंबरीत येतो. या वैचारिक आत्मगुज यातून कादंबरी पुढे सरकत जाते. कर्तुत्वापेक्षा कर्तव्य व भविष्यापेक्षा भवितव्य यांचा शोध घेणारा वास्तववादी भोवताल ह्या कादंबरीचे अंतरंग बनते. तसेच कर्तव्य,समर्पण ,प्रमाणिकता व जवाबदारी यांचे भान व भाव या कादंबरीत अधोरेखित होतात.

स्वतःचा स्वतःशी संवाद एक विश्वास असतो. तो आयुष्यात मोठा दिलासा ठरतो. चांगले वाईट जग त्यातून कळायला लागते. व्यक्तीचे आत्मगुज हे नेहमीच प्रमाणिक असते. हकेला आतून आलेला होकार हा आत्मगुजाचा एक भाग असतो. व्यक्ती एखाद्या वेळेस दुसऱ्याला धोका देऊ शकतो पण तो स्वतःशीच स्वःताला धोका कधी देऊ शकत नाही. या कादंबरीत नायकाचे नकारात्मक आत्मगुजाचे सकारात्मक प्रतिसाद प्रत्ययास येतात. कादंबरीत आलेले आत्मगुज हे या कादंबरीत वेगळ्या वैशिष्ट्ये दर्शवतात.

हरितात्या एक मेहनती व्यक्तीमत्व. नौकरी करून चाळीत स्वतःची एक खोली कमावतो. हरितात्याची पत्नी सखुबाई चाळीतील एक कजाक व भांडकुदळी बाई अशी तिची ओळख असते.. त्यांचा मुलगा पिंट्याभाई व्यसनांध व गुंड असतो. एका मुलीला पटवून लग्न करुन घरी आणतो. अनेक मारामाऱ्या व अनेक धंद्यात तो पटाईत असतो. तो शंकऱ्यावर चाकूने वार करून फरार होतो. एका अपघातात मरणही पावतो. त्यामुळे सखूबाई खंगून जाते. शेवटी हरितात्या खोली विकून निघून जातो. आयुष्यात मेहनत व नितीमत्तेने केलेले हरितात्याची सगळी कमाई क्षणात मातीमोल होते. त्याला मायानगरीत मिळालेले सगळे मुलाच्या कर्तृत्ववाने फोल ठरते. मग आयुष्याचा पूर्वार्ध मेहनत व उतरार्ध पश्चात्ताप जातो. शंकऱ्याचे यशस्वी कुटुंब व हरितात्याचा संघर्ष या कादंबरीत सामाजिक तुलनात्मकता अधोरेखित करतो. मेहतीचा उत्कर्ष व व्यसनाधीनतेचे दुष्परिणाम या कुटुंबातील घटनेतून लेखकांनी कादंबरीत मांडले आहेत. नैतिक हरितात्या , कजाक सखूबाई व वाया गेलेला पिंट्याभाई या कादंबरीत मनाला कायमची हुरहूर लावून जातात. कोणतीच जागा, वस्तू व जमीन आपली कधीच नसते. सगळ्या कमाईतील संपत्ती पेक्षा संतत्ती खूप मोठी असते असाही एक संदेश कादंबरी देते. पावलं तेवढी स्थलांतराची इमान राखतात हे हरितात्याच्या एकंदरीत आयुष्यातून प्रत्ययास येते.

जेव्हा माणूस स्वतःपासून वेगळा होतो, तेव्हा जगण्यातील एकाकीपणा क्रुर वाटत जातो. रूममध्ये फिरणाऱ्या पंख्याला गळफास लावावे, पडीक इमारतीवरून उडी मारावे, वाळत जाणाऱ्या झाडासारखे जीवन संपवावे असे अनेक विकारी विचार गर्दीत हरवलेल्या माणसांची सोबत करतात.

झाडापासून तुटणारे पान म्हणजे स्वतःपासून स्वतःला विलग करण्याचे तंत्र बनते. डोळे बंद करून स्वतःभोवती काळोख निमिण करत उजेडापासून दूर जाणे असले तरी शेवटी उजेड आपले रंग दाखवतो. काळाच्या प्रत्येक टप्प्यात भौतिक गोष्टी अदृष्य पातळीवर आयुष्यात संचार करत असतात तेव्हा त्या प्रत्येक घटनेला पुढे जावेच लागते. मग जगात कांहीही शाश्वत उरत नसते. स्थिर राहून मार्गक्रमण करणे हेच योग्य असते. असे तत्वज्ञान कादंबरीच्या अनेक पानातून वाचायला मिळते. नायकाने चाळीतल्या सुधाला लपून छपून जून्या इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर भेटतो. सुधाचे नायकावर खूप प्रेम असते. अस्थिर जीवन व सुधाच्या कौटुंबिक भवितव्याचा विचार करत तिच्या प्रेमाप्रती तुसडा भाग ठेवून लेखक तटस्थपणे बचावात्मक भुमिका घेतो. स्वतःच्याच अस्तित्वाच्या लढाईत हरवलेला नायक सुधा प्रती अबोल व अव्यक्त राहतो. सुधा प्रेमासाठी आई बाप यांना समजावून नायकासोबत लग्न करण्याचे स्वप्न बाळगते. नायकाची भुमिका जगण्यातील अस्थिरतेचे मळभ उभे करते. कादंबरीत सुधाची प्रेम कहाणीचा कोणताच शेवट होत नाही. त्यामुळे वाचकास हुरहूर लागून जाते.

लावण्या नायकावर प्रेम करते. नेहमी नायकासोबत लटका राग दाखवत असते. लटक्या रागाची शाब्दिक जुगलबंदी दोघात रंगलेली वाचकास वाचायला मिळते. लावण्या नायकास पिक्चरला घेऊन जाते. आपल्या जीवनातील अनेक प्रसंगा बद्दल मनमोकळेपणाने व्यक्त होते. एकदाचे मन मोकळे करून मनाचा निचरा करून टाकते.

कंपनीचा मालक टटारिया नायकाला न आवडणारे व्यक्तीमत्व पण तो तेथे टिकून नौकरी करत असतो. बेधडकपणामुळे टटारिया नायकाला भीत असतो. उलट सुलट कांही बोलतच नसतो. सुधाची प्रेमासाठी निर्थक केविलवाणी धडपड.

गावातील मुलांना पडणारे कोडे त्यांचे कोवळे वर्तमान व खिलाडू जग व त्यांच्या खेळात नायक रमून जातो. ताईबाबाच्या शेळ्यासोबत पूर्ण माळ फिरून येतो. गावातली असंख्य माणसं व मुलं शहरात स्थायिक झालेले असतात. दररोज ते फोनवर गावाकडील खुशाली खबर न चुकता घेतात. नौकरी व कामानिमित्त शहरातील बंद खोलीत पडून असणारा गावाकडे माळावरील सनसेट व गावातील चार फोटो स्टेट्सला फोटो ठेवतो. खाली हॅप्पी फिलिंग असे लिहीतो. हरवलेल्या आनंदास पोरके झाल्यानंतरचा लटका आव तो माध्यमांवर दाखवत असतो. कशी का असेना गावाशी नाळ जोडून नवी पिढी विकासाकडे वाटचाल करत आहे.

शहरात असंख्य मंडळे आहेत. त्या माध्यमातून विकास कामे होतात. पाण्याची व्यवस्था, केरकचरा व्यवस्थापन व चाळीतील संडासाची व्यवस्था त्यात लाईट हे सगळे कामे मोहल्ला प्रतिनिधी करतात. लोक त्या बदल्यात त्यांचे मोठे मोठे बॅनर लावतात. संडासात लाईट लावली म्हणून पोरं लगेच नगरसेवकाला कार्यक्रमात कार्यक्रम सम्राट बोलतात. खेड्यापासून शहरापर्यंत अतिशयोक्ती व लाळ घोटण्याचे वातावरण सगळीकडे पसरलेले असे कादंबरीतून प्रत्ययास येते.

खोल खोल दुष्काळ डोळे या कादंबरीत लेखकांनी मांडलेले तत्वज्ञान हे एका कळत्या वयातील आत्मिक दोलायमान स्थितीचे अंतरंग वाटते. शहर व तेथील भेसूर जगाचा चेहरा व अंतरंग कादंबरीत अभ्यासपूर्ण येते. कादंबरीत मनाच्या अस्थिर मनस्थिचा कोलाज ऐकू येतो.सावली पायाशी घेऊन वसलेल्या शहरात स्थायिक झालेला मनुष्य स्वतःच्या सावलीवर येथे विश्वास करत नसतो. रस्त्या रस्त्यावर बसून जाणाऱ्या येणाऱ्यांची लुट करणारे टोळके निर्दयी असते. असे शहरी भयानक वास्तव या कादंबरीत आलेले आहे. जबाबदारी व कर्तव्य या चक्रात अडकलेला प्रत्येकजण पडेल ते काम करतो. अस्थिरतेच्या बेभरवशाच्या जगात तारेवरची कसरत करतो.

उंच उंच झाडातील सावली. त्यातील सळसळीतून तयार झालेले संगीत ऐकायला मिळते. निष्ठूर एकाकीपणात अशा यांत्रिक उपकरणातील थोडासा संयमी भवताल अनुभवायला मिळतो. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंतच्या शहरी जगात वावरतांना अस्थिर मनस्थिचे अंतरंग या कादंबरीत मंडले आहेत .कादंबरी पट हा चिंतनात्मक अंतर्वेशन आवर्तन आलेख वाटत राहतो.

**कादंबरी:खोल खोल दुष्काळ डोळे**
**लेखक :प्रदीप कोकरे**
**प्रकाशन :लोकवाङ्मय गृह**
**मुखपृष्ठ आणि रेखाटने: अन्वर हुसेन**
**किंमत:३००/–**
**पृष्ठे:१७६**

# जीर्ण झाल्या कौलारु घरात...

जीर्णझाल्या कौलारु घरात
आज दिवा मिणमिणतोय
सावल्यांना पांघरुन अंगभर
वृध्द म्हातारा कण्हतोय...?
सुगीच्या दिवसात खोपटात
सुख समृध्दी नांदतेय
उष्ट्या पत्रावळी चाटत
म्हातारा भुक क्षमवतोय
नदी नाल्या तुडूंब झाल्या
चैतन्य दरवळतय रानात
अर्धवटपोटी म्हातारा आज
पाण्यासाठी तरसतोय?
कुणी म्हणे तो मालक
कुणी म्हणे तो भिकारी
वृध्दकाळाने हालत अशी
साहतोय स्वता:च्याच घरी
वाटण्या करुन फसला
अन झालाय आता लाचार
जन्म दात्या लेकरांनाच
आज वाटतोय त्याचा भार
त्याच्या आर्धांगिनीने
मधेच सोडली साथ
पुरता कोलमडला बिचारा
करतोय परिस्थिवर मात

**रुपाली वागरे/वैद्य**
नांदेड
९८६०२७६२४१

# शेतकरी उभा बांधावर

वादळ-वारा, ऊन-पाऊस
झेलीत अंगावर
काळ्या आईची ओटी भराया
शेतकरी उभा बांधावर

मिरचीचा ठेचा
चतकोर भाकरीवर
ठिगळाचं धोतर
घालीतो अंगावर
शेतकरी उभा बांधावर

अनवाणी पायाला
घाबरतो जनावर
मैत्रीचा हात देऊन
वावरतो शेतावर
शेतकरी उभा बांधावर

अगणित घटे
त्याच्या हातावर
वेदना कसली
त्या उमलत्या कळीवर
शेतकरी उभा बांधावर

वंदीत राहो सदा
तुझे उपचार
अभिमानाने देश उभा
तुझ्या कर्तृत्त्वावर
शेतकरी उभा बांधावर.

**–गोविंद कवळे**
इळेगाव(गं. प.) पो. बोळसा, ता. उमरी
जि. नांदेड मो. ७३८७२६७२१९

# वक्त हर किसीका आता है!



आता प्रत्येकालाच कोणतीही गोष्ट लवकरात लवकर कमी वेळात पाहिजे आहे. मग ती नौकरी असो की, एखादे कोणतेही काम असो. कमी मेहनतीमध्ये जास्त नफा कसे मिळवणार हे बघितलं जातं. आता स्पर्धेचे युग आहे. इथे प्रत्येकच व्यक्ती धावपळ करीत असतो. आज देशामध्ये खूप सुशिक्षित वर्ग निर्माण झाला आहे.

सुशिक्षित असूनही नौकऱ्या नाही. नौकरी मिळवण्यासाठी आता अनेक विद्यार्थी धावपळ करीत आहेत. भरपूर मुलं-मुली स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करतांना दिसतात. काहींना यश मिळते तर काहींना अनेक वर्षे अभ्यास करूनही अपयश येतांना दिसतो. काही विद्यार्थी तर अपेक्षाच सोडून देतात आणि दुसऱ्या क्षेत्रात वळतात.

आज अभ्यासाच्या नावा-खाली मुलं-मुली पुणे, मुंबई सारख्या शहरात जात असतात. आई-वडील हे मुलांच्या भविष्यासाठी त्यांना महागाडी कोचिंग क्लास लाऊन देतात. असे पण काही विद्यार्थी आहेत जे अभ्यासाच्या नावाखाली आईवडिलांकडून पैसे मागून मौज मजा करीत असतात. काही विद्यार्थी अनेक वर्षापासून अभ्यास करूनही त्यांना यश मिळत नाही. आता त्यांना यश का मिळत नाही हे त्यांच्या मेहनतीवर व प्रत्येकाच्या महत्त्वाकांक्षेवर अवलंबून आहे. माझ्या सोबत अभ्यासिकेमध्ये एक मुलगा आहे तो आता वयाच्या एकविसाव्या वर्षी एअर फोर्समध्ये असिस्टंट मॅनेजर म्हणून त्याची निवड झाली. त्याच्या मनात अधिकारी व्हायची खूप जिद्द आहे. त्यासाठी तो खूप मेहेनतही घेतो. वयाच्या एकविसाव्या वर्षी नौकरी मिळवली आणि अधिकारी होण्याची जिद्द आपल्यासाठी प्रेरणादायी आहे. आपल्या मनात जिद्द असेल तर आपण कोणतेही काम करू शकतो. काहींना यश हे उशिरा मिळतो तर काहींना लवकर मिळत असतो.अनेक वर्षे अभ्यास करूनही सतत अपयश येतो हे बघुन काही विद्यार्थांच्या मनात नैराश्य निर्माण होतो. आणि अश्या वेळी आत्महत्या सारखे पाऊल उचलत असतात. जीवनात एखाद्या क्षेत्रात अपयश आले म्हणून असे टोकाचे पाऊल उचलणे चुकीचे आहे. ह्या एका चुकीच्या निर्णयामुळे आपल्या आईवडिलांना याचा काय परिणाम होईल याचा विचारही आपण करीत नाही.प्रत्येक आईवडिलांना वाटते की आपले मुल मुली नौकरीवर लागावे.

आपल्याला बघुन ते जगत असतात. आपणच त्यांचे आधार असतो. आणि आपण जर असे टोकाचे पाऊल उचलले तर त्यांच्यावर खूप आघात होईल. जर नौकरी मिळाली नाही तरी आपण कोणताही व्यवसाय करू शकतो. पर्याय म्हणून खूप संधी आपल्या जवळ असतात . परंतु एकदा गेलेले प्राण परत कधीच येत नाही. म्हणून आपल्या मनात कधीही नकारात्मक विचार आणू नये. नकारात्मक विचाराने माणसाची विचार करण्याची क्षमता कमजोर होतो. हिम्मत ठेवायला शिका, कारण जिवनात कधी कुणाची दिशा बदलायला वेळ लागत नाही. आणि कुणाची दशा होईल हेही सांगता येत नाही. म्हणून प्रयत्न सुरू ठेवा.

जीवन खूप सुंदर आहे इथ सर्वांनाच संधी मिळत असते. प्रत्येक गोष्टीचा व क्षणाचा आनंद घ्या. कारण जीवन हा फक्त एकदाच मिळत असते. अपयशाला न घाबरता प्रयत्न करीत राहा. कधीतरी यश नक्कीच मिळेल. परिस्थिती कधीच सारखी नसते यश अपयश हे जीवनात येतच राहणार फक्त हिम्मत ठेवायला शिका. कारण 'वक्त हर किसी का आता है.'

**–प्रिती व्ही. खोब्रागडे**
मु. गुरढा, लाखनी

# ‘रासेयो’ विभागाने नव्या शैक्षणिक धोरणाची माहिती लोकांपर्यंत पोहचवावी -कुलगुरू डॉ.चासकर

## राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार मंडळ बैठकीत कुलगुरूंनी दिल्या सूचना

**नांदेड (प्रतिनिधी)–** विद्यार्थ्यांच्या मनामध्ये जो संभ्रम आहे. तो दूर करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाने एक महिन्याचा नाविन्यपूर्ण उपक्रम तयार करावा. प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत जाऊन नवीन शैक्षणिक धोरण काय आहे? याची सखोल माहिती द्यावी, असे आवाहन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि. २६ मार्च रोजी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या अध्यक्षतेखाली व प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्या उपस्थितीत राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार मंडळाची बैठक संपन्न झाली. या बैठकीत ते बोलत होते.

डॉ. मनोहर चासकर यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वार्षिक नियोजन व आढावा उपक्रम याविषयी सविस्तर चर्चा करत बैठकीत मांडलेल्या ठरावाला मंजुरी




दिली.

या बैठकीत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये पूर्व प्रजासत्ताक निवड प्रक्रिया राज्यस्तरीय शिबीर घेतल्याबद्दल तसेच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे आव्हान-२०२४ राज्यस्तरीय शिबिरासाठी नियोजन समितीत राजभवन कडून निवड झाल्याबद्दल राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी, वित्त व लेखाधिकारी मोहम्मद शकील अब्दुल करीम यांचे अभिनंदन करण्यात आले. दिल्ली येथे राष्ट्रीय स्तरावर प्रजासत्ताक दिन पथसंचलनामध्ये अभिज्ञा मनुरकर यांनी सहभाग नोंदवल्याबद्दल अभिनंदन करण्यात आले. तसेच राष्ट्रीय एकात्मता शिबीर, उत्कर्ष, आव्हान, प्रेरणा यासारख्या राज्यस्तरीय व राष्ट्रीय शिबिरासाठी निवड झालेल्या स्वयंसेवकांचा व संघ व्यवस्थापकांचा अभिनंदनाचा ठराव घेण्यात आला. अशा प्रकारच्या उपक्रमामध्ये उत्कृष्ट कार्य करून विद्यापीठाचे नावलौकिक करण्यात यावे, असे मत यावेळी कुलगुरूंनी व्यक्त केले.

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग राष्ट्रीय सेवा योजना कक्ष मंत्रालय मुंबई यांच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील उत्कृष्ट कार्यक्रमाधिकारी प्रशंसा व प्रमाणपत्र पुरस्काराबद्दल कार्यक्रमाधिकारी डॉ. केशव अलगुले व स्वयंसेवक विद्यार्थी संदीप कळासरे यांच्या अभिनंदनाचा ठराव घेण्यात आला. वार्षिक लेखे याविषयी चर्चा करण्यात आली. अनुदान वाटप यासारख्या विद्यापिठीय कामकाज या सर्व विषयाला कुलगुरू महोदयाच्या व सर्व सल्लागार मंडळाच्या वतीने मान्यता देण्यात आली.

या बैठकीला कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, वित्त व लेखाधिकारी मोहम्मद शकील अब्दुल करीम, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सूर्यप्रकाश जाधव, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी, अहमदनगर येथील राष्ट्रीय सेवा योजना प्रशिक्षण केंद्राचे संचालक डॉ. गोकुळदास गायकवाड, प्राचार्य डॉ. वसंत सातपुते, प्राचार्य विजयकुमार कानवटे, सिनेट सदस्य तथा प्राचार्या डॉ. आशा मुंडे, डॉ. शारदा कदम, डॉ. प्रकाश सुर्वे, डॉ. शिवराज बोकडे, डॉ. केशव अलगुले, डॉ. अमोल काळे, डॉ. अरुण पडघन, डॉ. सचिन हाटकर, विद्यार्थिनी प्रतिनिधी कु. साक्षी खंदारे यांची प्रमुख उपस्थिती होती. या बैठकीच्या यशस्वीतेसाठी ‘रासेयो’ विभागातील कर्मचारी ए. आय. शेख, तुकाराम हंबर्डे यांनी परिश्रम घेतले.

## ओंजळभर पाणी आणि मुठभर धान्य उपक्रम



**कुंडलवाडी (प्रतिनिधी)–** शहरातील युवकांनी ‘ओंजळभर पाणी आणि मूठभर धान्य’ पक्षासाठी हा एक उपक्रम चालू केला आहे. या उपक्रमाचे सर्वत्र कौतूक होत आहे.

कुंडलवाडी शहरातील पक्षी संवर्धनासाठी ठिकठिकाणी झाडांना ओंजळभर पाणी आणि मुठभर धान्य मावेल असे प्लास्टिकचे घर करण्यात आले आहे. ते झाडांना बांधण्यात आलेले आहेत. सदर के. रामलू मंगल कार्यालय मार्गापासून ते आरोग्य दवाखाना ते राजेश्वर मंदिर या रस्त्याकडे जात असताना ठिकठिकाणी झाडांना बांधण्यात आलेले आहेत. नागरिक त्यांच्याकडील पाणी किंवा थोडेसे धान्य यात बाजूला धान्य आणि आत पाणी टाकत आहेत. तसेच घराजवळ किंवां छतावर, शेतातील झाडांवर पक्षांसाठी पाण्याची व थोड्याशा धान्याची सोय करण्यात आली आहे. या उपक्रमाबद्दल डॉ. नरेश बोधनकर व साई भोकरे यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## थोडक्यात...

### विजय माने यांची पीएसआयपदी निवड



**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात येणाऱ्या संयुक्त अराजपत्रित गट ब परीक्षा २०२३ परीक्षेत शहरातील विजय सुनंदा उत्तमराव माने यांची पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाली आहे. शारदानगर येथील रहिवासी विजय उत्तमराव माने यांनी कुठल्याही स्पर्धा परीक्षेचे क्लास न करता फक्त ऑनलाईन शिक्षण व स्वतःच्या मेहनतीने हे यश संपादन केले. या निवडीबद्दल आई सुनंदा गंगाराम कौशल्ये, बहीण रोहिणी माने-डोणे, त्यांचे मेव्हणे प्रा. डॉ. गजानन डोणे, पवन पवार, डॉ.उमेश चंचलवड, इंजि. किरण शिंदे, डॉ. संदीप कदम सुरज परसुरे, सुमित परसुरे, तसेच सर्व मित्रपरिवाराने अभिनंदन केले आहे.

### निबंध स्पर्धेत दुर्गा मोरे हिचे यश

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळगाव (लिखा) शाळेतील विद्यार्थीनी कु. दुर्गा राजेश मोरे हिला छ. शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) पुणेच्या वतीने आयोजित तालुकास्तरीय निबंध स्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. शिक्षण आयुक्त सुरज मांढरे, सारथीचे अध्यक्ष अजित निंबाळकर यांच्या स्वाक्षरीचे तिला प्रमाणपत्र देण्यात आले. तिला सांस्कृतिक विभाग प्रमुख मारोती कदम, वर्गशिक्षक तानाजी केंद्रे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल मुख्याध्यापक विठ्ठल रिठे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नारायण मोरे, केंद्रप्रमुख उमाकांत देशटवार, त्र्यंबक उदबुके, ज्ञानोबा विटकर, संजय कदम, संगिता भोळे, शंकर मेंगावार, जयश्री अंबोरे आदींनी अभिनंदन केले आहे.

## राहुल हंबर्डे यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या प्रदेश सरचिटणीसपदी नियुक्ती

**नांदेड (प्रतिनिधी) –** नांदेड दक्षिण मतदार संघातील धडाडीचे युवा कार्यकर्ते राहुल हंबर्डे यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या प्रदेश सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीचे सर्वत्र स्वागत होत आहे.



माजी आमदार मोहनराव हंबर्डे यांचे पुत्र राहुल हंबर्डे यांचा शहर व ग्रामीण परिसरात चांगला जनसंपर्क आहे. पक्षाध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित दादा पवार व प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, युवकचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली राहुल हंबर्डे यांनी पक्ष संघटनेचे कार्य सुरु केले आहे. सदस्य नोंदणी अभियानात जिल्ह्याचा अहवाल क्रमांक यावा यासाठी ते प्रयत्नरत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या शिफारशीवरून प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांनी त्यांची ही नियुक्ती केली आहे. आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते त्यांना नुकतेच नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, माजी आमदार मोहनराव हंबर्डे, अविनाश घाटे, जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, बाळासाहेब रावणगावकर, जीवन घोगरे, वसंत सुगावे, मोहसीन खान पठाण, श्रीधर नागपूरकर, बालाजी शिंदे, माधव चिंचाळे, प्रसाद पवार, शिवा डांगे, गणेश येरकले प्रदीप देमगुंडे आदीची उपस्थिती होती.

## जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते मुदखेड येथे नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत शेतकऱ्यांना सातबाराचे वाटप

**मुदखेड (प्रतिनिधी)–** येथील तहसील कार्यालयात मिशन १०० दिवस अंतर्गत २७ मार्च रोजी शेतकऱ्यांच्या ७/१२ वरील नावाची दुरुस्ती करून दुरुस्त केलेल्या ७/१२ चे वाटप करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची प्रमुख उपस्थिती होती.

उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी यांच्या संकल्पनेतून तालुक्यातील गोबरा तांडा, तोरणा तांडा आणि वरदडा तांडा येथील नागरिकांना जातीचे दाखले आणि ऑनलाईन रेशन कार्डचे वाटपही जिल्हाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी यावेळेस मार्गदर्शन करताना मुख्यमंत्र्यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या मिशन १०० दिवस अंतर्गत विविध उपक्रमांची माहिती दिली. तसेच तहसील कार्यालयात निर्माण करण्यात आलेल्या विविध कार्यालयीन सुधारणांचा आढावा घेतला.

मंडळ अधिकारी पठाण यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमास उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी, तहसीलदार आनंद देऊळगावकर, नायब तहसीलदार विजयकुमार पाटे तसेच सर्व ग्राम महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी आणि लाभार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणासाठी मातंग समाजाचे मुख्यमंत्र्यांना निवेदन



**किनवट (प्रतिनिधी)–** अनुसूचित जातींमधील उपवर्गीकरण त्वरित करण्यात यावे, अशी मागणी किनवट व माहूर तालुक्यातील सकल मातंग समाजाने किनवटचे उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत शनिवारी दि.२८ मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

याबाबत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सर्वोच्च न्यायालयाने दि. १ ऑगस्ट २०२४ रोजी दिलेल्या निर्णयाने अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरण करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने त्वरित कार्यवाही करत उपवर्गीकरणाचा आराखडा तयार करावा आणि त्याची अंमलबजावणी करावी, अशी ठाम भूमिका मातंग समाजाने घेतली आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरण करण्यासाठी आराखडा तयार करावा, या प्रक्रियेसाठी समिती गठीत करून त्वरित निर्णय घ्यावा, अनुसूचित जातींमध्ये असलेल्या सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास घटकांना न्याय मिळावा, उपवर्गीकरणाच्या प्रक्रियेत पारदर्शकता ठेवून त्याचा लाभ गरजू घटकांपर्यंत पोहोचावा, अशा मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत. अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरणाची प्रक्रिया न झाल्यास तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा मातंग समाजाच्या नेत्यांनी यावेळी बोलताना दिला.

## बदलत्या युगानुसार आमुलाग्र बदल आत्मसात करण्यासाठी शिक्षक क्षमतावृध्दी प्रशिक्षण -गटशिक्षणाधिकारी संग्राम कांबळे



**नरसी (प्रतिनिधी)–** बदलत्या युगानुसार सर्वच क्षेत्रात आमुलाग्र बदल होत आहेत. असेच बदल शिक्षण क्षेत्रातही होत आहेत. त्यामुळे असे आमुलाग्र बदल आत्मसात करण्यासाठी शिक्षक क्षमतावृध्दी प्रशिक्षण दिले जात आहे, असे प्रतिपादन गट शिक्षणाधिकारी संग्राम कांबळे यांनी केले.

२४ ते २८ मार्च दरम्यान नरसी येथील शिक्षक क्षमता वृद्धी पाचवा टप्पा प्रशिक्षण समारोप प्रसंगी ते बोलत होते.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० ची देशभर अंमलबजावणी सुरू झाली विविधी पातळ्यांवर क्षमता वृद्धी प्रशिक्षण शिबीर घेण्यात येत आहेत. त्याचाच एक भा म्हणून मिलिनियम इंग्लीश मेडीअम पब्लीक स्कुलमध्ये पाचवा टप्प्याचे प्रशिक्षण घेण्यात आले. यावेळी प्राचार्य संजय पाटील, प्राचार्य फाजगे, शिक्षण विस्तार अधिकारी विठ्ठल दगडगावे, शिवराज साधू, बालाजी नागठाणे, मुख्याध्यापक जाधव, बामने, देवाले माधवराव, पाटील, गायकवाड, महादेव सोमवार यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी सहभागी प्रशिक्षणार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. मान्यवरांसह, प्रशिक्षणार्थी माधव सौंजे यांनी अभिप्राय देतांना सुंदर कविता वाचन करून प्रशिक्षण साध्य झाल्याचे सांगितले. प्रा. शोभा शिंदे, श्रीमती भोसले, शर्मा, बालाजी नागठाण आदी शिक्षिकांनीही आपली मनोगते व्यक्त केली.

## शिवसेना ओबीसी व्हिजेएनटी नायगाव तालुका अध्यक्षपदी यन्नावार तर उपाध्यक्षपदी गंथकवाड

**नांदेड (प्रतिनिधी)–** शिवसेना शिंदे पक्षाच्या ओबीसी व्हिजेएनटी नायगाव तालुका अध्यक्षपदी मारोती यन्नावार यांची तर उपाध्यक्षपदी नरबा गंथकवाड नियुक्ती करण्यात आली आहे. नांदेड जिल्हाप्रमुख अनिल पाटील धमने यांच्या हस्ते दि २७ मार्च रोजी मारोती यन्नावर व नरबा गंथकवाड यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

अनेक वर्षा पासून सामाजिक राजकीय क्षेत्रात विविध सामाजिक उपक्रम राबविले असून आजवर सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनिय कार्याची दखल घेऊन त्यांना शिवसेना ओबीसी व्हिजेएनटी पक्षाच्या नायगाव तालका अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. यावेळी नायगांव विधानसभा अध्यक्ष पवन कुमार पुट्टेवाड नांदेड दक्षिण अध्यक्ष देवराव पांचाळ, शिवाजी भारती, गणपत चुकेलवार आदींची निवड करण्यात आली.

हिंदूहृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण याचा आपण सक्रियपणे प्रचार प्रसार कराल व तसेच शिवसेना पक्ष वाढीसाठी आपण सर्व घटकांना सोबत घेऊन संघटन वाढवून कार्य कराल असा विश्वास व्यक्त केला आहे. या निवडीचे सर्वत्र स्वागत होत आहे.

## यशवंतमधील दोन कॅडेट्सची शिबिरासाठी निवड

**नांदेड (प्रतिनिधी)–** यशवंत महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅडेटस् श्रीनाथ धनजे आणि शंकर वहिंदे यांची जम्मू आणि काश्मीर येथे होणाऱ्या राष्ट्रीय शिबिरासाठी निवड झालेली आहे.

यानिमित्त प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन.शिंदे यांनी दोन्ही कॅडेटस्चा सत्कार करून शुभेच्छा दिल्या आहेत. याप्रसंगी राष्ट्रीय छात्र सेनेचे लेफ्टनंट प्रा. श्रीकांत सोमठाणकर आणि प्रा. प्रियंका सिसोदिया यांची उपस्थिती होती. जम्मू आणि काश्मीर येथील राष्ट्रीय शिबिराचा कालावधी १७ मे ते २७ मे आहे. या ट्रेकिंग कॅम्पचा उद्देश कॅडेटस्मध्ये आत्मविश्वास जागृत करणे हा आहे.

## एसटी महामंडळ नांदेड विभागीय सार्वजनिक भीमजयंती मंडळ कार्यकारिणीची निवड

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ नांदेड विभागाच्यावतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती मंडळाची कार्यकारिणीची स्थापना करण्यात आली आहे. अध्यक्ष म्हणून डॉ.चंद्रकांत वडस्कर, कार्याध्यक्ष अशोक कांबळे, सचिव लक्ष्मीकांत गवारे, सहसचिव राहुल गजभारे, कोषाध्यक्ष गणेश कळसे यांनी निवड करण्यात आली आहे.

दि.२७ मार्च २०२५ गुरूवार रोजी दुपारी ठिक १ वाजता एसटी मध्यवर्ती बसस्थानक नांदेड येथील रेस्टहाऊसमध्ये बैठक घेण्यात आली. अध्यक्षस्थानी विभाग नियंत्रक डॉ.चंद्रकांत वडस्कर हे होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून विभागीय कामगार अधिकारी लक्ष्मीकांत गवारे, आगार व्यवस्थापक अनिकेत बल्हाळ, बसस्थानक प्रमुख यासीन हमीद खान, वाहतुक निरीक्षक मयुर तेलंगे, श्रमिक संघटनांचे पदाधिकारी कार्यकर्ते, कामगार-कर्मचारी सौ. आम्रपाली जमदाडे, रघुनाथराव वाघमारे, बाळू हाटकर, राजेश कांबळे, निर्दोष पवार, एसटी मेकॅनिक गुणवंत मिसलवाड, चंद्रकांत पांचाळ, राहुल गजभारे, यशोदीप अटकोरे, रामेश्वर कांबळे, सिद्धार्थ जोंधळे, राहुल कोकाटे, केशव टोनगे, राजेश शेळके, संजय दुधमल, सुनिल मोरे, गणेश कळसे, अनिल अत्रे, मनोहर माळगे, देविदास दुम्पलवार, दिवसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## मनपा सिडको क्षेत्रीय कार्यालयाचे कर निरीक्षक वसंत कल्याणकर यांचा उत्कृष्ट कर्मचारी म्हणून गौरव



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड महानगरपालिकेच्या सिडको क्षेत्रीय कार्यालयातील कर निरीक्षक वसंत कल्याणकर यांचा उत्कृष्ट कर्मचारी म्हणून पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, मनपा आयुक्त डॉ. महेश डोईफोडे आणि जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

मनपाच्या २८ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अधिकारी, कर्मचाऱ्यांना गौरविण्यात आले. त्यातसिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत सहाय्यक आयुक्त डॉ. मिर्झा बेग यांच्या आदेशानुसार जानेवारी महिन्यात एक कोटी रुपयांच्या मालमत्ता कर वसूल करून उद्दिष्ट पूर्ण केल्याबद्दल वसंत कल्याणकर यांना उत्कृष्ट कर्मचारी म्हणून गौरविण्यात आले. कार्यालय अधीक्षक विलास गजभारे, कर निरीक्षक संजय नागापूरकर, वरीष्ठ लिपीक नारायण आठवले मारोती सारंग, प्रकाश दर्शने, वसुली लिपीक मालु एनफळे, रविंद्र पवळे, सुधीर कांबळे, नरसिंग कुलकर्णी, रमेश यशवंतकर, नथुराम चवरे, विवेक लोखंडे, उत्तम जोंधळे, दीपक जोंधळे, कार्यालयीन कर्मचारी मिना अडबलवार, अर्चना जोंधळे, मुक्ता धर्मकेर, बालाजी लोहगावकर यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

## विभागीय रेल्वे सेवा पुरस्कार-२०२५ चे डीआरएम कार्यालयात वितरण

**नांदेड (प्रतिनिधी)–** दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाचा ‘रेल सेवा पुरस्कार’ समारंभ नांदेड येथील विभागीय रेल्वे कार्यालयात दि. २८ मार्च रोजी नांदेड येथे उत्साहात संपन्न झाला. तसेच आंतरराष्ट्रीय महिला दिना साजरा करून महिलांच्या प्रेरणा आणि यशाला सलाम करण्यात आला. यावेळी नांदेड विभागात आयोजित आंतरविभागीय क्रीडा स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार करण्यात आला.




रेल्वे इन्स्टिट्यूट, नांदेड येथे झालेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्रीमती नीति सरकार होत्या. या कार्यक्रमात अपर विभागीय रेल्वे व्यवस्थापक राजेंद्र कुमार मीना, बीके ब्रम्हकुमारी केंद्राच्या निर्देशिका श्रीमती बी.के स्वाती, यशवंत महाविद्यालयाच्या उपप्राचार्या कविता सोनकांबळे, दक्षिण मध्य रेल्वे महिला कल्याण संघटनेच्या सचिव श्रीमती वंदना मिश्रा यांच्यासह नांदेड विभागातील विविध अधिकारी, कर्मचारी आणि कुटुंबीयांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमात श्रीमती निती सरकार यांनी नांदेड विभागातील २० कर्मचाऱ्यांचा ‘रेल सेवा पुरस्कार’ देवून गौरव केला. हा ‘रेल सेवा पुरस्कार’ कर्मचाऱ्यांनी वर्ष २०२४-२५ दरम्यान रेल्वे सेवेत दिलेल्या विशेष योगदाना बद्दल त्यांचा सन्मान आणि कौतुक करण्याकरिता दिला जातो.

या प्रसंगी श्रीमती निती सरकार म्हणाल्या की, हा समारंभ प्रत्येक रेल्वे कर्मचाऱ्यासाठी अभिमानाचा क्षण असतो. जेव्हा वर्षभर केलेल्या कामाचे विश्लेषण केले जाते आणि केलेल्या कामाचे आणि प्रयत्नांचे कौतुक आणि सन्मान केला जातो. गेल्या आर्थिक वर्षात म्हणजेच २०२४-२५ मध्ये केलेल्या कामाच्या आढावा घेऊन विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना पुरस्कृत केले जात आहे. आमच्यासाठी ही खूप अभिमानाची गोष्ट आहे की, यावर्षी नांदेड विभागाच्या मेकॅनिकल आणि इंजिनिअरिंग विभागाला सर्वोत्तम देखभालीसाठीचे दक्षिण मध्य रेल्वे क्षेत्रीय स्तरावरील प्रतिष्ठित शिल्ड मिळाल्या आहेत.

अलिकडेच, नांदेड विभागात २८ फेब्रुवारी २०२५ ते ०७ मार्च २०२५ दरम्यान आंतरविभागीय क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये विविध विभागातील एकूण ५६० कर्मचाऱ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. या स्पर्धांमधील सर्व ५० विजेत्यांचे आणि क्रिकेट, व्हॉलीबॉल सारख्या खेळांच्या विजेत्या संघांचे श्रीमती सरकार यांनी अभिनंदन केले. आमचे खेळाडू येत्या वर्षात अधिक मेहनत करतील आणि केवळ विभागीय स्तरावर नव्हे तर अखिल भारतीय रेल्वे स्तरावर आयोजित केलेल्या क्रीडा स्पर्धांमध्ये नांदेड विभागाचे नाव उंचावतील, असा विश्वास विभागीय रेल्वे व्यवस्थापक निती सरकार यांनी यावेळी व्यक्त केला.

श्रीमती सरकार ह्या पुढे म्हणाल्या की, भारतीय रेल्वेमध्ये महिलांची भूमिका दिवसेंदिवस वाढत आहे. रेल्वेचे संचालन असो, स्टेशन व्यवस्थापन असो, तिकीट तपासणी असो किंवा सुरक्षा व्यवस्था असो, आमच्या महिला कर्मचारी प्रत्येक क्षेत्रात त्यांच्या क्षमता दाखवत आहेत. यामुळेच नांदेड विभागात मेकॅनिकल विभागातील ०८ लोको पायलट, ऑपरेशन विभागातील ०६ आणि अभियांत्रिकी विभागातील ११८ महिला कर्मचारी रेल्वेच्या कामाला गती देत आहेत.


CMYK

# चंदेरी

## हृतिक रोशनचं दिग्दर्शनात पदार्पण

**बॉलीवूडमधील सध्याच्या काही आघाडीच्या अभिनेत्यांपैकी एक लोकप्रिय अभिनेता म्हणजे हृतिक रोशन. आतापर्यंत हृतिकने अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये काम केले. बॉलीवूडचा 'ग्रीक गॉड' म्हणूनही त्याला ओळखले जाते. 'क्रिश', 'वॉर'यांसारख्या अनेक ॲक्शन चित्रपटांमधील त्याच्या भूमिका चांगल्याच गाजल्या. अभिनेता म्हणून आजवर आपल्या प्रेक्षकांचे मनोरंजन करणारा हृतिक आता लवकरच दिग्दर्शक म्हणून भेटीला येणार आहे.**

हृतिकचे वडील राकेश रोशन यांनी स्वतः याविषयी सांगितलं आहे. आदित्य चोप्रा यांच्याबरोबर मिळून ते 'क्रिश ४' ची निर्मिती करणार आहेत. पुढच्या वर्षी २०२६ च्या सुरुवातीला या चित्रपटाच्या



शूटिंगला सुरुवात होणार आहे. हृतिक रोशन 'क्रिश ४' मध्ये तो दिग्दर्शकाची भूमिकाही साकारणार आहे. याबद्दल राकेश रोशन यांनी आपल्या इन्स्टाग्रामवर लेकाबरोबरचा खास फोटो शेअर केला आहे आणि असं म्हटलं आहे की, "डुग्गू २५ वर्षांपूर्वी मी तुला अभिनेता म्हणून लाँच केले होते आणि आज पुन्हा २५ वर्षांनंतर मी तुला दिग्दर्शक म्हणून लाँच करत आहोत. जेणेकरून मी आदित्य चोप्राबरोबरचा सर्वात महत्त्वाकांक्षी चित्रपट पुढे नेऊ शकेन. याबद्दल तुला आशीर्वाद आणि यश मिळो या शुभेच्छा." राकेश रोशन यांना या गोष्टीचा आनंद आहे की, आदित्य चोप्रा 'क्रिश ४' चे निर्माते आहेत. याविषयी बोलताना ते म्हणाले, "आदित्य आणि यशराज फिल्म्स हे 'क्रिश ४' च्या निर्मितीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत. आदित्यनंच हृतिकला दिग्दर्शक बनवण्याचा निर्णय घेतला. आदित्य आणि हृतिकची निर्माता-दिग्दर्शक जोडी एक अफलातून आणि अप्रतिम असेल." दरम्यान, 'क्रिश' चित्रपट भारतातील लोकप्रिय सुपरहीरो फ्रँचायझी आहे. याची सुरुवात ही २००३ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'कोई मिल गया' या चित्रपटानं झाली होती. त्यानंतर २००६ मध्ये 'क्रिश' आणि २०१३ मध्ये आलेल्या 'क्रिश ३' हा चित्रपट प्रदर्शित झाला. हे तिन्ही चित्रपट बॉक्स ऑफिसवर सुपरहिट ठरले. त्यानंतर आता 'क्रिश ४'ची सर्वांना उत्सुकता लागली आहे. त्याचबरोबर आजवर अभिनेता म्हणून चाहत्यांच्या भेटीला आलेल्या हृतिक रोशनलाही त्याच्या नवीन दिग्दर्शकाच्या भूमिकेत पाहण्यासाठी त्याचे चाहते मंडळी चांगलेच उत्सुक आहेत. मात्र हृतिकने दिग्दर्शित केलेल्या 'क्रिश ४'साठी त्याच्या चाहत्यांना २०२६ पर्यंत वाट पहावी लागणार आहे.

## वय जेवढे लिहिले आहे, तेवढे राहणारच!



**सलमान खानची विशेष मुलाखत**

**बॉलिवूडमध्ये साडेतीन दशकांहून अधिक काळ घालवल्यानंतर, सलमान खानने गेल्या अनेक वर्षांपासून ईदवर वर्चस्व गाजवले आहे. या वेळी तो प्रसिद्ध साऊथ दिग्दर्शक ए.आर. मुरुगादॉस यांच्यासोबत सिकंदर चित्रपट घेऊन येत आहे. खास मुलाखतीत सलमानने त्याच्या चित्रपटाव्यतिरिक्त कुटुंब, बॉक्स ऑफिस, जीवे मारण्याच्या धमक्या, राजकारण, वयातील अंतर इत्यादी अनेक मुद्द्यांवर भाष्य केले...**

**प्रश्न : सलमान, तुझे कुटुंबावरील प्रेम नेहमीच दिसून येते, त्याबद्दल काय सांगशील ?**

» **सलमान :** कुटुंबावरील प्रेम हे संगोपनातून येते. जेव्हा आई आणि बाबांचे लग्न झाले तेव्हा ते वेगवेगळ्या संस्कृती आणि धर्मांचे होते. पण माझ्या आजोबांसाठी, मुद्दा हा नव्हता की माझे वडील मुस्लिम होते. त्यांची समस्या अशी होती की तो चित्रपट उद्योगातील एक व्यक्ती होते. माझे आजोबा माझ्या वडिलांना त्यांच्या लग्नाच्या पाच वर्षांनी भेटले, तेही



सोहेलचा जन्म झाला तेव्हा. त्यावेळी त्यांनी माझ्या वडिलांना खूप प्रेम दिले आणि म्हणाले की माझ्या आयुष्यातील सर्वात मोठी चूक म्हणजे त्यांनी पाच वर्षे त्यांना न भेटता वेळ वाया घालवला. एकदा जेव्हा माझ्या आईचे भांडण झाले आणि ती तिच्या माहेरी गेली तेव्हा माझ्या आजोबांनी सांगितले होते की तू असं घर सोडून इथे तुझ्या आईच्या घरी येऊ नकोस. तुम्ही इथे लोकांना भेटण्यासाठी येऊ शकता, पण घराबाहेर पडून नाही. भांडण होत राहतात. तू घरी परत जा. तो एक चांगला माणूस आहे. माझे वडील सलीम खान यांनी माझ्या आजोबांवर काय जादू केली होती हे मला माहीत नाही. जेव्हा आम्ही १८-२० वर्षांचे झालो तेव्हा आमच्या वडिलांचे मित्र आमचे मित्र झाले. आमचे मित्र आमच्या वडिलांचे मित्र बनले. माझ्या भावांचे मित्रही माझ्या भावांसारखेच आहेत.

**प्रश्न : तुझ्या चित्रपटासोबतच, दक्षिणेतील प्रसिद्ध स्टार मोहनलालचा एम्पुरण देखील प्रदर्शित होत आहे. दक्षिणेतील सर्व कलाकार तुझा अभिनेता म्हणून खूप आदर करतात...**

» **सलमान :** मला अभिनेता म्हणून मोहनलाल सर खूप आवडतात. मला वाटतं त्यांचा चित्रपट अद्भूत असेल. दक्षिण भारतीय कलाकारांबद्दल बोलायचे झाले तर, त्यापैकी अनेकांनी माझ्यासमोरच त्यांच्या कारकिर्दीची सुरुवात केली. जसे राम चरण, ज्युनियर एनटीआर. मी दक्षिणेत वांकीला (वेंकटेश) चांगले ओळखतो. मी अनेक दक्षिण भारतीय कलाकारांसोबत काम केले आहे. दक्षिण भारतीय निर्माते नवीन विषयांवर चित्रपट बनवतात. तथापि, त्यांचे चित्रपट यशस्वी होतात आणि अपयशीही होतात.

**प्रश्न : सलमान, धमक्या मिळणे हे तुझ्यासाठी काही नवीन नाही, पण या वयात तू निर्भय झाला आहेस की अजूनही अस्वस्थ आहेस ?**

» **सलमान :** अल्ला आणि देव आहे. आपले वय जेवढे लिहिले आहे, तेवढे राहणारच आहे. मात्र जेव्हा इतके लोक सोबत घेऊन चालावे लागते, तेव्हा प्रॉब्लम होऊन जातो.

**प्रश्न : तुझा चित्रपटात एक संवाद आहे, मला मुख्यमंत्री, पंतप्रधान याबद्दल माहिती नाही, पण मी आमदार, खासदार होईन, तर सलमान, भविष्यात राजकारणात येण्याचा विचार तू करतोस का ?**

» **सलमान :** यानंतर चित्रपटात आणखी एक संवाद आहे, मला त्यात रस नाही, कारण राजकारण हे माझे क्षेत्र नाही. जेव्हा एखाद्याला शासन आणि प्रशासन माहित नसते तेव्हा त्याने या क्षेत्रात येऊ नये. आम्हाला ते माहीत नाही. ते आमचे काम नाही.

**प्रश्न : चित्रपटात तुझ्या आणि नायिका रश्मिका मंदाना हिच्या वयातील फरकाबद्दल बरीच चर्चा सुरू आहे.**

» **सलमान :** जेव्हा जेव्हा मी नवीन मुलींसोबत काम करतो, तेव्हा मी त्यांना एक मोठे व्यासपीठ देण्याचा आणि त्यांना एक मोठा स्टार बनवण्याचा प्रयत्न करतो. जर मला अनन्या पांडे आणि जान्हवी कपूरसोबत काम करायचे असेल तर मला दहा वेळा विचार करावा लागेल. पण दहा वेळा विचार करूनही मी ते करेन.

**प्रश्न : चित्रपटाच्या तिकिटांच्या किमतींवर मर्यादा घालावी असे तुम्हाला वाटते का ?**

» **सलमान :** ते नक्कीच असायला हवे. मला वाटतं तिकिटांचे दर कमी असायला हवेत. आम्ही जय हो दरम्यानही हे केले होते. सामान्य तिकिटांची किंमत ६५० रुपये होती, आम्ही ती २०० रुपये केली. मल्टिप्लेक्स मालकांना आपण काय म्हणावे ? त्यांना मोठ्या प्रमाणात भाडे, कॅन्टीन, लाईट बिल आणि कर्मचाऱ्यांचे पगार देखील द्यावे लागतात. पण असे असूनही, मला वाटते की तिकिटांच्या किमतींवर मर्यादा असायला हवी.

## करिअरला २५ वर्षे पूर्ण होताच सिद्धार्थ जाधवची मोठी घोषणा..!

**मराठीसह हिंदी कलाविश्वात आपली ओळख निर्माण करणारा हरहुन्नरी अभिनेता म्हणून सिद्धार्थ जाधवला ओळखलं जातं. नुकतीच त्याच्या अभिनय क्षेत्रातील प्रवासाला तब्बल २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. २६ जानेवारी २००१ मध्ये सादर केलेल्या 'तुमचा मुलगा काय करतो ?' या नाटकातून सिद्धार्थने रंगभूमीवर पदार्पण केलं होतं. यानंतर हळूहळू प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान निर्माण करून सिद्धार्थ सर्वांचा 'आपला सिद्धू' झाला.**

करिअरला २५ वर्षे पूर्ण होताच त्याने मोठी घोषणा केली आहे. सिद्धार्थ जाधव रंगभूमीवर पुनरागमन करणार आहे. 'ॲनिमल' असं या नाटकाचं नाव असून यानिमित्ताने सिद्धार्थ जाधव आणि महेश मांजरेकर १५ वर्षांनी पुन्हा एकदा रंगभूमीवर एकत्र काम करणार आहेत. यापूर्वी २०१० मध्ये दोघांनी 'मी शारुक मांजरसुंभेकर' या नाटकाचे शतकमहोत्सवी प्रयोग केले होते. सिद्धार्थ जाधवने करिअरच्या पंचविशीत आणखी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. अभिनेता आता निर्मिती क्षेत्रात पदार्पण करणार आहे. सिद्धार्थने आपल्या आई-वडिलांच्या नावाने स्वतःची नाट्यनिर्मिती संस्था सुरू केली आहे. त्याच्या नाट्यनिर्मिती संस्थेचं नाव 'ताराराम प्रॉडक्शन्स' असं आहे. सिद्धार्थच्या आईचं नाव तारा आणि वडिलांचं नाव रामचंद्र यावरून ताराराम प्रॉडक्शन्स हे



नाव ठेवण्यात आलं आहे. सिद्धार्थ जाधव म्हणाला, मी सर्वसामान्य कुटुंबातून पुढे आलो आहे. माझ्या आई-वडिलांनी प्रचंड कष्ट करून आम्हा भावंडांना वाढवलं आहे. आई-बाबांसाठी काहीतरी खास करावं अशी अनेक वर्षांपासूनची इच्छा होती. मी त्यांच्यामुळे आज इथवर पोहोचलो आहे. त्यामुळे त्यांच्या नावाने निर्मितीसंस्था सुरू करताना मला विशेष आनंद होत आहे. यामध्ये माझ्या साथीला माझे गुरू महेश मांजरेकर आहेत. यामुळे मी प्रचंड आनंदी आहे, असे तो म्हणाला. दरम्यान, सिद्धार्थ जाधवने निर्मिती क्षेत्रात पदार्पण केल्यावर संपूर्ण कलाविश्वातून अभिनेत्यावर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात येत आहे.

## उतारवयात प्रेमाबद्दल अशोक सराफ म्हणाले...

**दिग्गज अभिनेते अशोक सराफ व ज्येष्ठ अभिनेत्री वंदना गुप्ते लवकरच एका नवीन चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. लोकेश गुप्ते दिग्दर्शित 'अशी ही जमवा जमवी' या चित्रपटातून ते प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. या चित्रपटात अशोक सराफ व वंदना गुप्ते यांची जुगलबंदी पाहायला मिळणार असल्याचे या चित्रपटाच्या टिझरमध्ये पाहायला मिळाले. आता या चित्रपटाच्या निमित्ताने अशोक सराफ व वंदना गुप्ते यांनी नुकतीच मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी साठीनंतर प्रेम म्हणजे नक्की काय यावर त्यांनी वक्तव्य केले आहे.**

मुलाखतीत त्यांना विचारले की या वयात प्रेम म्हणजे तुमच्यासाठी काय आहे ? यावर बोलताना अशोक सराफ म्हणाले, प्रेम हे कायम राहतंच. पण आता एकत्र असणं महत्वाचं आहे. तुम्ही एकमेकांना किती साथ देता हे महत्वाचं आहे. साथ महत्वाची आहे आणि ती साथ तुम्ही कशी निभावता हे महत्वाचं आहे. उतारवयात एक वेगळीच स्टोरी बनते. या स्टेजवर एक वेगळं प्रेम होतं. वंदना गुप्ते म्हणाल्या, आता या क्षणाला प्रेम म्हणजे कुटुंब आहे. प्रेमापेक्षा मैत्री आणि त्यातील निस्वार्थी प्रेम, त्यातून कोणाकडे काही अपेक्षा नाहीत. एकमेकांबरोबर वेळ व्यतीत करणे. आता सगळ्या जबाबदाऱ्यातून तुम्ही पार पडलेले असता. कुटुंब आपापली निर्माण झाली आहेत. वंदना गुप्ते म्हणाल्या, की मला ७० व्या वर्षी अशी फिल्म करायला मिळते. प्रमुख भूमिका करायला मिळते हे केवढं मोठं भाग्य आहे. हे आमचं यश आहे. आम्ही काम करत राहिलो. मामांनी खूप काम केलेलं आहे. मी फार निवडक चित्रपटांत काम केलं. पण, या वयात हे करायला मिळणं आणि कदाचित असंही आपल्यामध्येही काहीतरी दडलेलं असेल. तर ते उघड करायला संधी मिळतेय. मैत्रीच्या पलीकडचं प्रेम असतं. साथ, सोबत असते. हा प्रेमाचा गोडवा आहे त्यात काही अपेक्षा नाहीत. तरूणपणाच्या प्रेमाची अपेक्षा फार वेगळी असते. पण आता त्या अपेक्षांच्या पलीकडे पलीकडे गेलेलं आहे. याबरोबरच, अशोक सराफ हे निर्मळ मनाचे आहेत. त्यांच्याकडून खूप गोष्टी शिकायला मिळतात, असेही वंदना गुप्ते यांनी म्हटले. 'अशी ही जमवा जमवी' हा चित्रपट १० एप्रिल २०२५ ला प्रदर्शित होणार आहे. चित्रपटांबरोबरच अशोक सराफ हे सध्या कलर्स मराठी अशोक मा.मा. या मालिकेतूनही प्रेक्षकांचे मनोरंजन करताना दिसत आहे.




## ऐश्वर्या राय बच्चनच्या बॉडीगार्डला पगार किती?



**बॉलीवूडमधील अनेक मोठे कलाकार हे त्यांच्या लाइफस्टाईलमुळे मोठ्या चर्चेत असतात. त्यांची सिक्युरिटी, बॉडीगार्ड हादेखील अनेकदा चर्चेचा विषय असतो. ऐश्वर्या राय-बच्चन ही बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक आहे. ती जर कोणत्या कार्यक्रमांना हजर राहत असेल, तर तिच्याबरोबर तिचा बॉडीगार्ड दिसतो आता तिच्या बॉडीगार्डचा नेमका पगार किती आहे, हे जाणून घेऊ...**

अनेक वर्षांपासून अभिनेत्री ऐश्वर्या राय-बच्चनबरोबर एक बॉडीगार्ड दिसतो. त्याचे नाव शिवराज असे आहे. तो ऐश्वर्या रायबरोबर अनेक ठिकाणी दिसतो. समोर आलेल्या माहितीनुसार, शिवराज हा बच्चन कुटुंबाचा एक भाग आहे. त्याचा पगार महिन्याला सात लाख रुपये इतका आहे. ऐश्वर्याचा बॉडीगार्ड शिवराज हा तिच्याबरोबर अनेक कार्यक्रमांना हजेरी लावतो. ऐश्वर्याबरोबरचा त्याचा बॉण्डदेखील उत्तम असल्याचे पाहायला मिळते. ऐश्वर्या राय अनेकदा शिवराजच्या कार्यक्रमांनादेखील हजर राहताना दिसली आहे. ऐश्वर्याचा दुसरा बॉडीगार्ड राजेंद्र ढोले हादेखील अनेक वर्षांपासून काम करत आहे. त्याचा वर्षाचा पगार एक कोटी आहे. तो ऐश्वर्याबरोबर चित्रपटांच्या सेटवर, ट्रिपदरम्यान सगळीकडे हजर राहत असल्याचे दिसते. ऐश्वर्या काय बच्चन काही दिवसांपासून तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे मोठ्या चर्चेत आहे. काही दिवसांपूर्वीच तिच्या कारला अपघात झाल्याचे समोर आले होते. ऐश्वर्या राय व तिची मुलगी आराध्या या बॉण्डिंगबद्दल अनेकदा चर्चा होताना दिसते. आराध्या ऐश्वर्याबरोबर अनेक ठिकाणी दिसते. मायलेकीच्या या जोडीचे चाहतेही कौतुक करताना दिसतात. ऐश्वर्या राय व अभिषेक बच्चन यांचा घटस्फोट होणार असल्याच्या चर्चांनादेखील उधाण आले होते. याचे कारण म्हणजे अनेक ठिकाणी ऐश्वर्या तिच्या लेकीबरोबर आणि अभिषेक बच्चन संपूर्ण बच्चन कुटुंबाबरोबर हजर राहिल्याचे पाहायला मिळाले होते. त्यामुळे त्यांच्यात घटस्फोट होणार असल्याचे म्हटले जात होते. मात्र, ऐश्वर्या व अभिषेक बच्चन यांनी याबाबत काहीही प्रतिक्रिया दिली नव्हती. त्यानंतर त्यांनी आराध्याच्या शाळेतील कार्यक्रमांना, तसेच काही कौटुंबिक कार्यक्रमांना एकत्र हजेरी लावली होती. त्यानंतर या चर्चांना पूर्णविराम मिळाला होता. दरम्यान, ऐश्वर्या राय व अभिषेक बच्चन यांनी २००७ साली लग्नगाठ बांधली होती. २०११ साली त्यांना मुलगी झाली. आराध्या असे तिचे नाव आहे. कामाच्या बाबतीत बोलायचे झाले, तर ऐश्वर्या पोन्नियिन सेल्वन २ मध्ये दिसली होती. तिच्या या भूमिकेचे मोठे कौतुक होताना दिसले. आता ती आगामी काळात कोणत्या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. अभिषेक बच्चन आय वॉन्ट टू टॉक या चित्रपटात दिसला होता.

## शाहिद कपूरचा 'देवा' चित्रपट आता ओटीटीवर



कधी 'राजीव माथूर', कधी 'आदित्य कश्यप', तर कधी 'कबीर सिंग'च्या रूपातून प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा शाहिद कपूर अलीकडेच पोलीस अधिकाऱ्याच्या भूमिकेत झळकला. 'देवा' चित्रपटातून पुन्हा एकदा शाहिद डॅशिंग अंदाजात दिसला. या ॲक्शन थ्रिलर चित्रपटाला बॉक्स ऑफिसवर प्रेक्षकांचा संमिश्र प्रतिसाद मिळाला. प्रदर्शित झाल्यानंतर पहिल्याच दिवशी 'देवा' चित्रपटानं ५.५ कोटींची कमाई केली होती. आता 'देवा' चित्रपट ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होत आहे. शाहिद कपूरचा 'देवा' चित्रपट ३१ जानेवारीला प्रदर्शित झाला होता. या चित्रपटात बऱ्याच दिवसांनंतर शाहिदचा ॲक्शन अवतार पाहायला मिळाला होता, जो प्रेक्षकांच्या चांगलाच पसंतीस उतरला. पण, शाहिदच्या 'देवा' चित्रपटाला प्रेक्षकांचा हवा तसा प्रतिसाद मिळाला नाही. माहितीनुसार, ५० कोटींच्या बजेटमध्ये तयार झालेल्या या चित्रपटानं जागतिक स्तरावर ५१.७३ कोटींची कमाई केली; तर भारतात फक्त ३७.८६ कोटींचा गल्ला जमवला. आता शाहिदचा 'देवा' चित्रपट घरबसल्या पाहता येणार आहे. 'देवा' चित्रपट २८ मार्चला ओटीटी प्लॅटफॉर्मवर उपलब्ध झाला आहे.

## श्रद्धा कपूरने खरेदी केली आलिशान गाडी

२०१० मध्ये 'तीन पत्ती' या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण करणारी श्रद्धा कपूर आता प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहे. शक्ति कपूर आणि शिवांगी कोल्हापुरी यांची ही लाडकी लेक आता बॉलीवूडची आघाडी अभिनेत्री आहे. सतत सुपरहिट चित्रपट देताना दिसत आहे. गेल्यावर्षी श्रद्धाचा 'स्त्री २' चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला. तिच्या या चित्रपटाला प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतलं. अशा या बॉलीवूडच्या आघाडीच्या अभिनेत्रीला गाड्यांची खूप आवड आहे. त्यामुळे आता श्रद्धाने आणखी एक नवी आलिशान गाडी खरेदी केली आहे. अभिनेत्री श्रद्धा कपूरने ४ सीटरची अल्ट्रा लग्जरी कार Lexus LM 350h खरेदी केली आहे; जी काळ्या रंगाची आहे. नुकतीच श्रद्धा या नव्या आलिशान गाडीमधून प्रवास करताना दिसली. या आलिशान गाडीची किंमत २.९३ कोटी आहे. श्रद्धाच्या या नव्या गाडीचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर खूप व्हायरल झाला आहे. सेलिब्रिटी फोटोग्राफर 'विरल भयानी'च्या इन्स्टाग्राम पेजवर श्रद्धा कपूरच्या आलिशान गाडीचा व्हिडीओ शेअर केला आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन



**पंढरपूर–** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते मुख्यमंत्र्यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी त्यांच्या समवेत पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सर्वश्री समाधान आवताडे, अभिजीत पाटील, गोपीचंद पडळकर, सचिन कल्याणशेट्टी, बाबासाहेब देशमुख, माजी आमदार राम सातपुते, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री तसेच मंदिर समितीचे सदस्य उपस्थित होते.

तत्पूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर संवर्धन विकास आराखड्याअंतर्गत सुरू असलेल्या कामांची पाहणी केली. यामध्ये श्री विठ्ठल गर्भगृह, श्री रुक्मिणी गर्भगृह, श्री विठ्ठल चारखांबी व सोळखांबी, बाजीराव पडसाळी, महालक्ष्मी मंदिर आदी ठिकाणची पाहणी करून आवश्यक त्या सूचना दिल्या.

## न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाची परीक्षा रद्द

**मुंबई–**न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाच्या आस्थापनेवरील सहायक रासायनिक विश्लेषक गट - ब, वैज्ञानिक सहायक गट - क, वैज्ञानिक अधिकारी (संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण) गट - ब आणि वैज्ञानिक सहायक संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण) गट - क संवर्गातील पदे निव्वळ कंत्राटी तत्वावर भरण्यात येणार आहेत. यासाठी नॅशनल फॉरेन्सकि सायन्स युर्निवर्सिटी यांच्यामार्फत ५ व ७ एप्रिल २०२५ रोजी घेण्यात येणारी परीक्षा रद्द करण्यात आली आहे.

या परीक्षेबाबत सुधारित वेळापत्रक व ठिकाण नव्याने कळविण्यात येईल, असे न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाच्यावतीने कळविण्यात आले आहे.

**रक्तदान सर्वश्रेष्ठ दान**

# गुढीपाडव्याआधी सोन्याची २४ तासांत तब्बल १२०० रुपयांनी वाढ



**मुंबई :** गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर अनेकजण सोन्याची खरेदी करतात. मात्र यंदाच्या गुढीपाडव्याला सोन्याची खरेदी ग्राहकांच्या खिशाला फटका बसवू शकते. गुढीपाढव्याच्या एक दिवस अगोदर म्हणजेच आज सोन्याचे भाव पुन्हा वाढले आहेत. सोन्याचे दर कमी होण्याची आशा असतानाच ऐन पाडव्याच्या तोंडावर जळगावच्या बाजारपेठेत सोन्याचे दर तब्बल ९२,५०० इतक्या विक्रमी उंचीवर जाऊन पोहोचले असल्याचं पाहायला मिळत आहे.

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केलेल्या आर्थिक धोरणाचा परिणाम सगळयाच्या जगाच्या अर्थ व्यवस्थेवर होत असल्याच पाहायला मिळत आहे. सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोन्याकडे गुंतवणूकदारांनी आपली गुंतवणूक ही सोन्याकडे वाळविल्याने सोन्याच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे. त्याचा परिणाम सोन्याच्या दर वाढीत झाला असून गेल्या चोवीस तासात सोन्याच्या दरात बाराशे रूपयांनी वाढ झाली आहेत. आज रविवारी (दि.२९) सोन्याचे दर ८९,५०० आहेत. तर जीएसटीसह हेच दर आज ९२५०० वर जाऊन पोहोचले आहेत. उद्या गुढीपाडव्याच्या दिवशी सोन्याचे दर किती असणार? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

सोन्याचे वाढलेले हे दर सर्व सामान्य ग्राहकांच्या आवाक्या बाहेरचे असल्याने सोने खरेदीबाबत ग्राहकांनी वेट अँड वॉचची भूमिका घेतली असल्याचे आज जळगावच्या बाजारपेठेत पाहायला मिळाले आहे. जे ग्राहक सोने खरेदीसाठी आले आहेत, त्यांना वाढलेले दर हे परवडणारे नसल्याने अपेक्षेपेक्षा कमी प्रमाणात सोन्याची खरेदी करावी लागत आहे. त्यामुळे सोन्याचे दर कमी व्हायला हवे, अशी अपेक्षा भंगाळे गोल्डचे संचालक आकाश भंगाळे यांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, सोन्याच्या दरासाठी २०२५ हे वर्ष चांगले दिसून येत आहे. सोन्याच्या दरात पहिल्या तीन महिन्यात आंतरराष्ट्रीय बाजारात १५.४ टक्के वाढ झाली आहे. भारतात सोन्याच्या दरात १४ टक्के वाढ झाली आहे. सोन्याच्या दरात सुरु असलेल्या तेजीमुळं यातील गुंतवणूकदारांना दिलासा मिळाला आहे. बँक ऑफ अमेरिकेनं सोन्याच्या दरासाठीचे टारगेट वाढवले आहे. त्यांच्या अंदाजानुसार सोन्याचे दर ३३०५ डॉलर प्रति औंसपर्यंत जातील. सोन्यातील गुंतवणूक अशाच प्रकारे वाढत राहिल्यास ते सोन्याचे दर ३५०० डॉलर प्रति औंसपर्यंत जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# म्यानमार भूकंपामध्ये मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या १६०० वर

**नवी दिल्ली:** म्यानमार आणि थायलंडमध्ये शुक्रवारी आलेल्या भूकंपाने मोठा हाहाकार माजवला आहे. शनिवारीही भूकंपाचे झटके जाणवले. शनिवारी दुपारी भूकंपाची तीव्रता ५.१ रिश्टर स्केल इतकी होती. भारताने भूकंपाचा धक्का बसलेल्या म्यान-मार आणि थायलंडच्या मदतीसाठी ऑपरेशन ब्रम्हा अंतर्गत मेडिकल टीम पाठवली आहे. म्यानारमध्ये भूकंपामुळे मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या १६४४ वर पोहोचली आहे.

म्यानमारमध्ये आलेल्या विनाशकारी भूकंपामुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. भारत सातत्याने बचावकार्य करत आहे. भारताने संवेदना प्रकट करताना शक्य होईल तितके मदतीचे आश्वासन दिले आहे. भारताने ऑपरेशन ब्रम्हा अंतर्गत स्पेशल मेडिकल टास्क फोर्स बचाव कार्यासाठी तैनात केले आहे.

लेफ्टनंट कर्नल जगनीत गिलच्या नेतृत्वात ११८ सदस्यीय मेडिकल टीम म्यानमारसाठी रवाना झाली आहे. ही टीम एअरबोर्न एंजल्स टास्क फोर्सचा भाग आहे.

शुक्रवारी चीन, म्यानमार, थायलंड आणि भारतात भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. म्यानमारमध्ये पहिला भूकंप १२.५० वाजता आला. याची तीव्रता ७.७ रिश्टर स्केल इतकी होती. या भूकंपाचा केंद्रबिंदु म्यानमारच्या सागाईंग शहराच्या जवळ पृथ्वीच्या १० किमी खोल होता. युनायटेड स्टेटस जिओलॉजिकल सर्व्हेने सांगितले की १२ मिनिटांनंतर दुसरा भूकंप आला. याची तीव्रता ६.४ इतकी होती. या भूकंपानंतर म्यानमार आणि थायलंडमध्ये जनजीवत पूर्णपणे उद्धवस्त झाले.

## टी. सी. हरवली

माझी अंजना वैजनाथ साखरे या नावाची इयत्ता १० वी सन १९९७ वर्षाची इंदिरा गांधी हायस्कूल हडको या शाळेची टी. सी. हडको-नांदेड दरम्यान प्रवासात हरवली आहे. ज्यांना सापडली असेल त्यांनी संपर्क करावा. **संपर्क पत्ता**-ए११६/एल११६/३,४ हडको-नवीन नांदेड मो. ९५०३०६५८२०

## Change In Name

My Old Name is SAHIL KHAN PATHAN SHER KHAN which now I am changing as New Name SAHIL KHAN SHER KHAN Henceforth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same AD- H.N.1-13-83 GALLI NO 3 PEERBURHAN NAGAR NEAR SANTOSH KIRANA SHOP PEERBURHAN NAGAR NANDED NANDED MAHARASHTRA 431605

## Change In Name

My Old Name is REHANA BEGUM PATHAN SHER KHAN which now I am changing as New Name REHANA BEGUM SHER KHAN Henceforth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same AD- H.N.1-13-83 GALLI NO 3 PEERBURHAN NAGAR NEAR SANTOSH KIRANA SHOP PEERBURHAN NAGAR NANDED NANDED MAHARASHTRA 431605


**CONSULTING PHYSIOTHERAPIST**
**कन्सल्टिंग फिजिओथेरपीस्ट**
डॉ.ईश्वर जी. हिंगोलीकर (PT) (B.P. Th)
उपलब्ध सुविधा
• कपिंग थेरपी (गोल्ड मेडलिस्ट) • ड्राय नीडलींग थेरपीस्ट
• ऑर्थोपेडिक रिहॅबिलिटेशन • टेपींग थेरपीस्ट
• न्यूरो रिहॅबिलिटेशन
नांदेड
होम व्हिजीट उपलब्ध 9657631231



ऑफर ऑफर A/C ऑफर
**महाराष्ट्र जेन्टस् ब्युटी सलुन**

फेशियल
१) गोल्ड फेशियल 499/-
२) VLCC फेशियल 499/-
३) डायमंड फेशियल 599/-

डी-टॅन्न
१) O3+ 349/-
२) रागा 299/

ब्लीच
१) ऑक्सी ब्लीच 299/-
२) ओलिविया ब्लीच 299/-

कलर
१) लोरियल 299/-
२) मॅट्रिक्स 299/-
३) रागा 249/-
४) गार्नियर 199/-

हेयर स्पा
१) लोरियल 249/-
२) मॅट्रिक्स 249/-

हॉटेल मंजू समोर, वजिराबाद, नांदेड. 9822972221




**कुत्रीचे पिल्ले विकणे आहे**

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८


## डीग्री हरवली

माझी शेख उम्मे सलमा शेख सलाम या नावाची बि.एस्सी.व बि.एड.पासची डिग्री वाजेगाव ते हडको ऑटो प्रवासात हरवली आहे. कोणाला सापडल्यास खालील नंबरवर संपर्क साधावा.

**-संपर्क पत्ता -**
**शेख उम्मे सलमा शेख सलाम**
**मो.७२१८३२१५३६**

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर नांदेड यांच्या न्यायालयात समक्षम श्रीमती बी.एम.एन देशमुख दिवाणी न्यायाधीश नांदेड किरकोळ अर्ज क्र.३१७/२०२५

अर्जदार-१.विमलबाई मारोती अनंतवार वय ७६ वर्षे धंदा घरकाम रा.सरपंचनगर तरोडा बु नांदेड

विरूद्ध

गैरअर्जदार- निरंक

दावा- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणप पत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र अर्ज केला आहे.अर्जदार मयत मारोती रघुनाथ अनंतवार यांचे वारस आहेत.मयत मारोती रघुनाथ अनंतवार यांचा मृत्यू दिनांक १५/६/२०१४ रोजी झाला.अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराशिवाय कोणीही मयताचे वारस नाहीत. अर्जदार यांनी मा.न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केला आहे.

तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वता न्यायालयात दिनांक ३/५/२०२५ रोजी किंवा तत्पुर्वी नोंदवावा.मुदतीनंतर येणाऱ्या आ-क्षेपाचा विचार करण्यात येणार नाही.व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.आज दिनांक २५/३/२०२५ रोजी माझ्या सहि व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले

**आदेशावरून**

**क.लिपीक** **सहाय्यक अधिक्षक**

**दुसरे सह दिवाणी न्यायालय क.स्तर नांदेड**

## नगरपरिषद भोकर जाहीर प्रगटन

**नाव परिवर्तन करणे बाबत**

जा.क्र./नपभो/नानो६/--

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,गजानन नामदेव जाधव यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.- गट.नं.- ४११- जुना वार्ड नं.-५ मधील प्लॉट नंबर - जुना मालमत्ता नंबर ११९० नविन वार्ड नं.१० नविन मालमत्ता नं.२८५८ साईज पुर्व पश्चिम ४१ फुट, दक्षिण उत्तर ४५ फुट, चुर्तसिमा पुर्वे -सुमेश अशोकराव जाधव यांची जागा, पश्चिम: रस्ता, दक्षिण :मोकळी जागा व राहूल कदम, उत्तर :रस्ता, वरील चर्तुसिमेच्या आ-तील जागेवर बांधकाम परवानगी देण्याबाबत कोणाचा काही आक्षेप असल्यास संबंधीतांनी आवश्यक लेखी पुराव्यासह हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत नगरपरिषद भोकर यांच्याकडे दाखल करावा.मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणताही उजर ऐकुन घेतला जाणार नाही.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

## नगरपरिषद भोकर जाहीर प्रगटन

**नाव परिवर्तन करणे बाबत**

जा.क्र./नपभो/नानो६/-

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,प्रशांत अशोक पोपशेटवार यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.-- गट. नं.- -९ जुना वार्ड नं.- ३ मधील प्लॉट नंबर -- जुना मालमत्ता नं.१६६०/२१ नविन वार्ड नं.- ३ नविन मालमत्ता नं.-२४८०/२ महाराष्ट्र गुंठेवारी विकास २०२१ च्या अनुषंगाने गुंठेवारी मिळण्यासाठी दिनांक २४/२/२०२५ रोजी नपा नोंदणी कृत इंजिनिअर यांच्याद्वारे संचिका सादर केली आहे.जागेची रूंदी दक्षिण उत्तर २० फुट, लांबी पुर्व पश्चिम २० फुट चुर्तसिमा पुर्वे -विक्री करणाऱ्याची जागा, पश्चिम: विक्री करणाऱ्याची जागा, दक्षिण :रस्ता, उत्तर :विक्री करणाऱ्याची जागा

वरील चर्तुसिमेच्या आतील जागेवर बांधकाम परवानगी देण्याबाबत कोणाचा काही आक्षेप असल्यास संबंधीतांनी आवश्यक लेखी पुराव्यासह हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत नगरपरिषद भोकर यांच्याकडे दाखल करावा.मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणताही उजर ऐकुन घेतला जाणार नाही.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

## नगरपरिषद भोकर जाहीर प्रगटन

**नाव परिवर्तन करणे बाबत**

जा.क्र./नपभो/नानो६/-

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,दिलीप केरबाराव यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.- गट.नं.- ३६जुना वार्ड नं.-३ मधील प्लॉट नंबर ३ जुना मालमत्ता नं.- नविन वार्ड नं.- नविन मालमत्ता नं.१८०४/१३ रूंदी दक्षिण उत्तर ३० फुट, लांबी पुर्व पश्चिम ४० फुट , चुर्तसिमा पुर्वे -प्लॉट नंबर ५०, पश्चिम: प्लॉट नंबर ३६, दक्षिण : प्लॉट नंबर ४३, उत्तर :४ मीटर रस्ता,

वरील चर्तुसिमेच्या आतील जागेवर गुंठेवारी प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाचा काही आक्षेप असल्यास संबंधीतांनी आवश्यक लेखी पुराव्यासह हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत नगरपरिषद भोकर यांच्याकडे दाखल करावा.मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणताही उजर ऐकुन घेतला जाणार नाही.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

## नगरपरिषद भोकर जाहीर प्रगटन

**नाव परिवर्तन करणे बाबत**

जा.क्र./नपभो/नानो६/-

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,दिलीप केरबाराव यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.- गट.नं.- ३६ जुना वार्ड नं.-३ मधील प्लॉट नंबर - जुना मालमत्ता नं.- नविन वार्ड नं.- नविन मालमत्ता नं.१७९९ रूंदी दक्षिण उत्तर ३० फुट, लांबी पुर्व पश्चिम ४० फुट , चुर्तसिमा पुर्वे -प्लॉट नंबर १६, पश्चिम: प्लॉट नंबर १४, दक्षिण : ४ मीटर रस्ता, उत्तर : प्लॉट नंबर ९

वरील चर्तुसिमेच्या आतील जागेवर गुंठेवारी प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाचा काही आक्षेप असल्यास संबंधीतांनी आवश्यक लेखी पुराव्यासह हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत नगरपरिषद भोकर यांच्याकडे दाखल करावा.मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणताही उजर ऐकुन घेतला जाणार नाही.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

## नगरपरिषद भोकर जाहीर प्रगटन

**नाव परिवर्तन करणे बाबत**

जा.क्र./नपभो/नानो६/-

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,महेरुन्निसास बेगम महमद युनूस यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.- गट. नं.- ५५४ जुना वार्ड नं.-३ मधील प्लॉट नंबर - जुना मालमत्ता नं.- नविन वार्ड नं.- नविन मालमत्ता नं.१९५३ रूंदी दक्षिण उत्तर ३० फुट, लांबी पुर्व पश्चिम ४० फुट , चुर्तसिमा पुर्वे -२० फुट रस्ता, पश्चिम: गट नंबर ६१६, दक्षिण : १० फुट रस्ता, उत्तर : प्लॉट नंबर १३० वरील चर्तुसिमेच्या आ-तील जागेवर गुंठेवारी प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाचा काही आक्षेप असल्यास संबंधीतांनी आवश्यक लेखी पुराव्यासह हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत नगरपरिषद भोकर यांच्याकडे दाखल करावा.मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणताही उजर ऐकुन घेतला जाणार नाही.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

## नगरपरिषद भोकर जाहीर प्रगटन

**नाव परिवर्तन करणे बाबत**

जा.क्र./नपभो/नानो६/-

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,दिलीप केरबाराव यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.- गट.नं.- ३६ जुना वार्ड नं.-३ मधील प्लॉट नंबर - जुना मालमत्ता नं.- नविन वार्ड नं.- नविन मालमत्ता नं.१८०१ रूंदी दक्षिण उत्तर ३० फुट, लांबी पुर्व पश्चिम ४० फुट , चुर्तसिमा पुर्वे -प्लॉट नंबर ५३, पश्चिम: प्लॉट नंबर ४४, दक्षिण : प्लॉट नंबर ४९,उत्तर : ४ मीटर रस्ता

वरील चर्तुसिमेच्या आतील जागेवर गुंठेवारी प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाचा काही आक्षेप असल्यास संबंधीतांनी आवश्यक लेखी पुराव्यासह हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत नगरपरिषद भोकर यांच्याकडे दाखल करावा.मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणताही उजर ऐकुन घेतला जाणार नाही.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...
किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# संतप्त ग्रामस्थांनी अंबाडी ग्रामपंचायतीला ठोकले टाळे

## हिशोब विचारताच मासिक सभेतून सरपंचांचा सभात्याग?



**किनवट (प्रतिनिधी)–** तालुक्यातील अंबाडी येथे शुक्रवारी दि. २८ रोजी ग्रामपंचायतीची मासिक सभा सुरू असताना सदस्यांनी हिशोबाची मागणी करताच सरपंचबाईंनी अभिलेखे हातात घेऊन सभात्याग केला. यामुळे संतापलेल्या गावकऱ्यांनी शनिवारी दि.२९ रोजी सरपंच व ग्रामविकास अधिकाऱ्याच्या कारभारावर रोष व्यक्त करत ग्रामपंचायत कार्यालयाला टाळे ठोकले. याप्रकाराची गटविकास अधिकाऱ्याकडून चौकशी होईपर्यंत टाळे उघडणार नाही, असा आक्रमक पवित्रा ग्रामस्थांनी घेतला आहे.

तालुक्यातील अंबाडी ग्राम पंचायतचा कारभार या ना त्या कारणाने नेहमीच चर्चेत असतो. दरम्यान, दि. २८ रोजी येथील ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच सौ. शितल जाधव यांच्या अध्यक्षतेखाली मासिक सभेचे आयोजन केले होते. कोरम पूर्ण असल्याने सभा सुरू झाल्यानंतर उपसरपंच व सदस्यांनी मागील मासिक सभा, ग्रामसभा आणि विकासनिधीच्या खर्चावर प्रश्न उपस्थित केले. त्यांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तर देता न आल्यामुळे चिडलेल्या सरपंचबाईंनी सभा सुरु असताना अभिलेखे व काही कागदपत्रे हातात घेऊन सभात्याग केल्याने एकच गोंधळ उडाला.

अर्धवट सभेमुळे संतापलेल्या सदस्यांनी ग्रामविकास अधिकाऱ्याला धारेवर धरले.त्यानंतर सरपंचाच्या ताब्यातील अभिलेखे व इतर कागदपत्रे ग्रामविकास अधिकाऱ्याने स्वतःकडे घेऊन उद्या ग्रामपंचायत कार्यालयात हजर होवू, असे आश्वासन दिले होते. परंतु, दि. २९ रोजी ते सुद्धा गैरहजर राहिल्याने सरपंच व ग्रामविकास अधिकारी यांच्या एकतर्फी व मनमानी कारभाराला वैतागून उपसरपंच दीपक तामगाडगे, सदस्य लक्ष्मण ठमके, आनंदराव हलवले, रमेश हलवले, दत्ता खडसे, व्यंकटी पंडलवार, संजय भवरे, पोचिराम भवरे, उमेश मुनेश्वर, बळवंत देठे, किशन आडे, अंबादास गेडाम, साहेबराव हलवले, प्रमेश्वर सिसले, पोषट्टी नक्कावार, मारोती पेंदोर, उल्हास भवरे, बंटी भवरे, भास्कर नक्कावार यांच्यासह शेकडो ग्रामस्थांनी अंबाडी ग्राम पंचायत कार्यालयाला टाळे ठोकून रोष व्यक्त केला आहे.

पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अंबाडी येथे येऊन पंचनामा करीत नाहीत, तोपर्यंत आम्ही टाळे उघडू देणार नाही, असा पवित्रा ग्रामस्थांनी घेतला आहे. याप्रकरणी आता गटविकास अधिकारी काय कारवाई करतात याकडे अंबाडीवासियांचे लक्ष लागून आहे.

**संगनमताने अपहार**

मागील महिन्याची मासिक सभा कोरमअभावी तहकूब झालेली असतानाही कागदोपत्री सभा दाखवून सरपंच शितल जाधव व ग्रामविकास अधिकारी मनीष येवते यांनी पाणीपुरवठा योजना अंतर्गत टाकी बांधकामाचे ८० लक्ष रुपये परस्पर उचल केले. शुक्रवारच्या सभेतील विषय चर्चेसाठी ठेवला होता. आपला आर्थिक गैरव्यवहार उघड होईल, या भीतीपोटी सरपंचाने सभेतून काढता पाय घेतला. या निमित्ताने सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी हे संगनमताने विकास कामात अपहार करतात हे स्पष्ट झाले आहे, असा आरोप ग्राम पंचायत सदस्य लक्ष्मण हिरामण ठमके यांनी केला आहे.

# वाहतूक नियमांचे पालन करा

## वाहतूक शाखेकडून नांदेडकरांना आवाहन



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील वाहतुकीला शिस्त लागावी वाहनधारकांनी नियमांचे पालन करावे. वाहतूक शाखेच्या पोलिसांच्या इशाऱ्याकडे लक्ष द्यावे. वाहतूक विस्कळीत होईल, असे वाहने उभे करू नये, आदी सूचनांचे पालन वाहनधारकांनी करावे, आदी विषय घेऊन शहर वाहतूक शाखेच्या वतीने महात्मा फुले पुतळ्यासमोर शनिवारी जनजागृती करण्यात आली.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी सुशिलकुमार नायक, शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक साहेबराव गुट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक जसपालसिंग कोटतिर्थवाले व एम. जी. एम. कॉलेज, नांदेड यांनी संयुक्तपणे जनजागृती करण्यात आली.

शहरातील आय. टी. आय. चौक, वजिराबाद चौक येथे नागरिकांनी व वाहनधारकांनी ट्राफिक सिग्नलचे नियम पाळणे, वाहन पार्कंगचे नियम व इतर मोटार वाहन कायदाचे नियम पाळणे, वाहन ओव्हर स्पीड चालविल्यास त्यांचे काय परिणाम होतात, दारू पिऊन वाहन चालविल्यास याचे काय दुष्परिणाम होतात, याबाबत सूचना व मार्गदर्शन करून जनतेत मोटार वाहन कायदा व वाहन चालविताना पाळण्याचे नियम संबंधाने जनजागृती करण्यात आली.

# गुढीपाडवा निमित्ताने सिडको व हडको बालाजी मंदिरात महाअभिषेक आयोजन





**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** गुढीपाडवा निमित्ताने ३० मार्च रोजी सिडको व हडको येथील बालाजी मंदिरात महाअभिषेक आयोजित करण्यात आला आहे. या नंतर भाविक भक्तांना दर्शनासाठी मंदिर खुले ठेवण्यात येणार आहे.

दर वर्षी प्रमाणे याही वर्षी नववर्षाच्या गुढीपाडवा निमित्त श्री बालाजी मंदिर देवस्थान आनंद सागर सोसायटी हडको नवसाला पावणारा बालाजी देवतेचा दि. ३० मार्च रोजी सकाळी ६.३०.वाजता सामुदायिक अभिषेक करण्यात येणार आहे.

साडेतीन मुहूर्तापैकी एक मुहूर्त आहे. गुढीपाडवाच्या दिवशी आपण सहपरिवार त्वरित नाव नोंदवून गुढीपाडव्याच्या दिवशी अभिषेक करावा असे आवाहन बालाजी मंदिर देवस्थानचे गुरुवर्य दुबे महाराज यांनी केले व विश्वस्त मंडळ श्री बालाजी मंदिर देवस्थान हडको यांनी केले आहे. सिडको येथील भगवान बालाजी मंदिर येथेही महाअभिषेक आयोजित करण्यात आला आहे. दिव्याशु महाराज यांच्या अधिपत्याखाली मंत्रोच्चार करून महाअभिषेक सकाळी संपन्न होणार आहे. या अभिषेक सोहळ्याला भाविक भक्तांनी नाव नोंदणी करावी, असे आवाहन मंदिर विश्वस्त समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# पोक्सोचा गुन्हा दाखल झाल्याने व्यथित मुख्याध्यापकाची आत्महत्या

## आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या चार जणांवर गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** पासदगाव येथील एका शाळेतील मुख्याध्यापकावर पोक्सोचा गुन्हा दाखल झाल्यानंतर व्यथित मुख्याध्यापकाने विष पिऊन शाळेतच आत्महत्या केली. त्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या चार जणांविरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शालेय विद्यार्थिनीचा विनयभंग केल्याप्रकरणी पोक्सोचा गुन्हा दाखल झाल्यानंतर मुख्याध्यापक असलेल्या सुनील भानुदास कारामुंगे (वय ४८) हा पासदगाव येथील पुष्पांजली प्राथमिक विद्यालयात मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते. विशेष म्हणजे ते गणित आणि विज्ञान विषय शिकवत होते. एवढेच नाही तर त्यांना दहावीचे पेपर तपासणीचे कामही मॉडरेटर म्हणून देण्यात आले होते. परंतु आपल्याच वर्गातील विद्यार्थिनीला अश्लील मेसेज केल्याप्रकरणी त्यांच्याविरुद्ध पोक्सोचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

ही माहिती समजताच पिडीत विद्यार्थिनीच्या नातेवाईकांनी त्यांना घरी बोलावून दम दिला एवढेच नाही तर दहा लाख रुपयांची मागणी केली. या त्रासास कंटाळून व आपली समाजात आता बदनामी होणार या भीतीने सुनील कारामुंगे (वय ४८) यांनी शाळेत जाऊन विष प्राशन करून आत्महत्या केली. मृत्यूपूर्वी त्यांनी चिठ्ठी लिहून त्यात त्यांच्या मृत्यूस कारणीभूत असणाऱ्यांची नावे लिहिली होती. ती चिठ्ठी पोलिसांनी जप्त केली आहे. तर दुसरीकडे शहराच्या दत्तनगर भागात राहणारे प्रथमेश भुजंग टेंभुनवार, भुजंग मारोतराव टेंभुनवार, विद्या भुजंग टेंभुनवार आणि एक अल्पवयीन व त्याचे काही साथीदार यांनी संगणमत करून सुनील कारामुंगे यांना शिवीगाळ करत मारहाण करून दहा लाखांची मागणी केली होती. यामुळे त्यांनी आत्महत्या केल्याचे प्रणव सुनील कारामुंगे यांनी आपल्या फिर्यादीत नमूद केले आहे.

प्रणव कारामुंगे याच्या फिर्यादीवरून वरील चार जणांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास चवळी करत आहेत.

# मधुकरराव खरवडकर यांचे निधन



**नांदड (प्रतिनिधी)–** शिवाजीनगर येथील रहिवासी व हल्ली मुंबई येथे स्थायिक झालेले मधुकरराव माणिकराव खरवडकर (वय ८८) यांचे मुंबई येथील लीलावती रुग्णालयात उपचारादरम्यान दि. २६ मार्च २०२५ रोजी निधन झाले. खरवडकर मंत्रालयातून मुख्यमंत्र्यांचे सचिव म्हणून १९९५ मध्ये सेवानिवृत्त झाले. त्यांची बहुतांश शासकीय सेवा मंत्रालयात झाली व तेथून ते निवृत्त झाले. हल्ली ते आपल्या मुंबई येथील मुलाकडे वास्तव्याला होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, दोन मुली व जावई असा परिवार आहे.

# कौशल्याबाई कळणे यांचे निधन



**मुदखेड (प्रतिनिधी)–** सरेगाव (ता. मुदखेड) येथील समाजसेविका कौशल्याबाई जीवनराव कळणे यांचे दि. २८ रोजी रात्री उशिरा अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शनिवारी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, चार मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. माजी सरपंच जीवनराव कळणे यांच्या त्या पत्नी होत.

# अखंडपाठ साहेब गैरव्यवहारप्रकरणातील मुख्य आरोपीस 'स्थागुशा'कडून अटक

**नांदेड (प्रतिनिधी) –** सन २०१७ ते २०१९ या काळामध्ये तख्त सचखंड श्री हुजूर साहेब गुरुद्वारा नांदेडमध्ये अखंड पाठ साहेब या सेवेमध्ये सेवा प्रकरणात ३६ लाख ६९ हजार ३५० रुपयांचा गैरव्यवहार झाला होता. या गैरव्यवहारातील मुख्य आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली आहे.

या सेवा प्रकरणात ३६ लाख ६९ हजार ३५० रुपयांचा गैरव्यवहार झाला होता. या प्रकरणातील तीन आरोपींना जामीन मिळालेला आहे. या प्रकरणाची तक्रार जगदीपसिंघ नंबरदार यांनी केली होती. जगदीश सिंग नंबरगार यांच्या फिर्यादीनुसार वजिराबाद पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

अखंड पाठ साहेब ही एक सेवा असून त्यासाठी भाविक गुरुद्वारा बोर्डाकडे पैसे जमा करतात. सन २०१७ ते २०१९ दरम्यान या सेवेमध्ये गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी अनेक शिख भाविकांनी केल्या होत्या. त्यानंतर एक चौकशी समितीची स्थापना करण्यात आली. या समितीने चौघे दोषी असल्याचा अहवाल दिला. त्यानंतर जगदीप सिंग नंबरदार यांनी दिलेल्या १६ जुलै २०२४ रोजीच्या तक्रारीनुसार वजिराबाद पोलिसांनी भादंवि कलम ४२०, ४०६ आणि ३४ नुसार चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

सध्या या गुन्ह्याचा तपास एलसीबीकडे होता. मिळालेल्या गोपनिय माहिती आधारे, दि. २७ मार्च रोजी आरोपी महिपालसिंघ लिखारीस नांदेडच्या रेल्वेस्टेशनमधून अटक केली. सहाय्यक पोलीस निरीक्षक विठ्ठल घोगरे आणि त्यांच्या पथकाने आरोपीस न्यायालयासमोर उभे केले असता न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे.



**नांदेड :** शनि अमावास्यानिमित्त शहरातील जंगमवाडी येथील शनि मंदिर, हनुमान मंदिर येथे दर्शन घेण्यासाठी भक्तांनी मोठी गर्दी केली होती. (छाया : ज्ञानेश्वर सुनेगावकर)

# गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर राष्ट्रवादीच्या सदस्य नोंदणी अभियानाला आजपासून सुरुवात

**नांदेड (प्रतिनिधी)–** राष्ट्रवादी काँग्रेसच्या सदस्य नोंदणी अभियानाला गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर दि. ३० मार्च रोजी सुरुवात होणार आहे . नांदेड जिल्ह्यात जास्तीत जास्त सदस्य नोंदणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य डॉ. मीनल पाटील खतगावकर यांनी केले आहे.



नांदेड जिल्ह्यात आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेसच्या संघटनात्मक बांधणीसाठी आणि कार्यकर्त्यांना ऊर्जा देण्याच्या अनुषंगाने ३० मार्च रोजी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या सदस्य नोंदणीचा शुभारंभ करण्यात येणार आहे. राज्याचे माजी मंत्री तथा माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वाखाली नांदेड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या सदस्य नोंदणीला प्रारंभ करण्यात येणार आहे. माजी मंत्री भास्करराव पाटील खतगावकर यांच्या नेतृत्वाखाली आणि आ. चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसला अधिकाधिक बळ मिळवून देण्यासाठी आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये जिल्ह्यात नंबर एकचा पक्ष करण्याचे अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेसची सदस्य नोंदणी मराठवाड्यात सर्वाधिक नांदेड जिल्ह्यातून झाली पाहिजे. या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस मधील सर्वच घटकातील कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे. शहरी व ग्रामीण भागातील युवक युवतीनाही सदस्य नोंदणी सहभागी करून घ्यावे. आपल्या भागाच्या आणि आपल्या विकासासाठी नागरिकांनी आणि युवक युवतींनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या सदस्य नोंदणीत सहभागी व्हावे, असे आवाहनही डॉ. मीनल पाटील खतगावकर यांनी केले आहे.

# नांदेड पोलीस आणि कुटुंबांकरीता श्री गुरु गोविंदसिंघजी उद्यान व ओंमकार ध्यान धारणा केंद्राचे उद्घाटन



**नांदेड (प्रतिनिधी) –** पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या पुढाकारातून आणि गुरुव्दारा लंगर साहेब, श्री हुजुर साहेब नांदेड (ग्रीन सिटी प्रोजेक्ट) चे संत बाबा नरिन्दर सिंघजी, संत बाबा बलविंदर सिंघजी कारसेवावाले यांच्या सहकार्यातून पोलीस अधिकारी, कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांचे मानसीक आरोग्य सुदृढ राहण्यासाठी पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर श्री गुरु गोविंद सिंहजी उद्यान व ओमकार ध्यान धारणा केंद्र सुरु करण्यात आले आहे आहे. पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या हस्ते दि. २७ मार्च रोजी या दोन्ही उद्यान व केंद्राचे उद्घाटन करण्यात आले.

उद्यानाच्या निमित्ताने प्रसन्न, नयनरम्य, मनशांती देणाऱ्या परिसराची निर्मीती पोलीस मुख्यालयात करण्यात आली आहे.

सदर उद्यानात विविध आयुर्वेदिक औषधी, वनस्पती, फुलपाखरांचे उद्यान, पाखरांचा कोपरा म्हणून पक्षांना आवडणारी झाडे तसेच सिता पंचवटी, नवगृह अशी विविध वनस्पतींची लागवड करण्यात आलेली आहे. येणाऱ्या प्रत्येकांना तेथे निसर्गाचा आनंद घेता येईल अशा रितीने लॉन, कारंजे, बैठक व्यवस्था करण्यात आली आहे.

सदर उद्घाटन कार्यक्रमास पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, पोलीस उपअधीक्षक डॉ. अश्विनी जगताप, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, संत बाबा बलविंदरसिंघजी कारसेवावाले, मोटार परिवहन विभागाचे पोलीस निरीक्षक दिलीप चोपडे, राखीव पोलीस निरीक्षक विजय धोंडगे तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com